मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

वर्ष २३ अंक : अकरावा

मार्च
१९६९

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणीच्या फेब्रुवारी ६९ च्या अंकात पृ. २९५ वर 'वैदर्भीय-काव्यदर्शन' हा डॉ. मा. गो. देशमुख यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. हा लेख म्हणजे दि. १५ जानेवारी ६९ रोजी वि. सा. संघाच्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या 'वैदर्भीय काव्यदर्शन' या कार्यक्रमासाठी डॉ. मा. गो. देशमुख यांनी तयार केलेले निवेदन आहे.

तसेच फेब्रुवारीच्या अंकात पृ. ३२३ वर श्री. जी. एन्. जोशी यांचा 'मराठी भावगीतांची वाटचाल' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. हा लेख म्हणजे वैदर्भीय काव्यदर्शन या कार्यक्रमाच्या प्रसंगी श्री. जोशी यांनी केलेले अध्यक्षीय भाषण आहे.

युगवाणीच्या चालू अंकात श्री. देवीसिंह चौहान व श्री. वि. मा. दी. पटवर्धन यांनी वि. सा. संघात दिलेली भाषणे लेखरूपाने प्रसिद्ध होत आहेत.

संपादक, 'युगवाणी'

खुलासा

'युगवाणी' चा फेब्रुवारी १९३९ चा अंक काही अडचणीमुळे उशीरा वाचकांच्या हाती पडला याबद्दल दिलगीर आहो.

-संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) मार्च १९६९ (अंक ११

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेषे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
धंतोली, नागपूर-१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ

३३० “ एकच प्यालयातील ” सुधा सिंधु
प्रा. वि. मा. दी. पटवर्धन

३४१ दक्खिनी हिंदी व तिला मराठीची देन
देविसींग व्यंकटसिंग चौहान, लातूर

३५४ मिर्जा गालिब
नाना शेंडे

३५६ पुस्तक परिक्षण

पुस्तक परीचय

संघवार्ता

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"एकच प्याल्यांतील" सुधा सिंधु

प्रा. वि. मा. दी. पटवर्धन

"एकच प्याला" ही एक अमर कलाकृती आहे. शाकुंतल हे एकच नाटक लिहून कालिदास कवि कुलगुरू झाला असता. तसं गडकऱ्यांनी हे एकच नाटक लिहिलं असतं तरी मराठी साहित्यात ते अजरामर झाले असते. माझं हे विधान काही जणांना कदाचित् अतिशयोक्त वाटले तर त्यांना मी नम्रपणानं सांगेन की गडकऱ्यांचे बाबतीत थोडी अतिशयोक्ती आपण क्षम्य समजावी. म्हणजे ते स्वतः अति रोचक अतिशयोक्तीचे आलमगीर होते म्हणून नव्हे; तर त्यांच्या प्रतिभेचं मोजमाप घेण्यात आपण कमी पडतो म्हणून. प्रसिद्ध टीकाकार हॅझलिट यानं शेक्स्पीयरविषयी एके ठिकाणी म्हटलं आहे, An overstrained enthusiasm to pardonable with respect to Shakespeare than the want of it, for our admiration cannot easily surpass his generous मला वाटतं हे उद्‌गार गडकऱ्यांनाही लागू पडावेत.

हे नाटक दोन वर्षं गडकऱ्यांच्या डोक्यात घोळत होतं. लिहून तयार झालं १९१७ अखेर. रंगभूमीवर आलं जवळ जवळ दीड वर्षांनंतर. मध्यंतरीच्या काळात गडकरी कालवश झाले. आपल्या आवडत्या नाटकाचा प्रयोग या महान नाटककाराला पहावयास मिळालाच नाही. त्यांच्याऐवजी त्यांचे बंधुतुल्य मित्र श्री. वि. सी. गुर्जर यांना आयत्या वेळी नाटकात पदार्पण (!) करावं लागलं. म्हणजे या नाटकाकरतां पदं लिहून द्यावी लागली. इतकी भावमधुर आणि रसोत्कर्षक पद्यरचना, देवल सोडले तर दुसऱ्या कोणाच्याही नाटकाला लाभलेली नाही.

जन्मापासूनच दैवदुर्विलास कपाळी आलेल्या या नाटकावर अनेक प्रथितयश साहित्यिकांनी लिहिले आहे. किंबहुना परीक्षणं, समीक्षणं, अभ्यास, टीकालेख अशा विविध स्वरूपांत या नाटकावर जेवढं साहित्य निर्माण झालेलं आहे तेवढं इतर कोणत्याही मराठी नाट्यकृतीवर झालेलं निदान माझ्या पहाण्यांत नाही. प्रा. ना. सी. फडके, श्री. वि. स. खांडेकर, डॉ. रा. शं वाळिंबे, आचार्य प्र. के. अत्रे आणि प्राचार्य गंगाधर गाडगीळ यांनी तर स्वतंत्र प्रकरणंच लिहीली आहेत. शिवाय शिवरामपंत भावे, वि. सी. गुर्जर, मामा वरेरकर, ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. के. क्षीरसागर, चिंतामणराव कोल्हटकर अशा मातब्बर मंडळींनी इतर गडकरी वाङ्मयाबरोबर याचा सखोल परामर्ष घेतलेला आहे. तसेच श्री. न. चिं. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, प्रा. श्री. म. माटे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, व. शां. देसाई, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादि प्रज्ञावंतांनी या नाटकाबद्दल व्यासपीठावरून वेळोवेळी आपले विचार मांडलेले आहेत.

टीकाकारांच्या (अध्वर्यु-प्रा. फडके) मते नाटकाची रचना फार सदोष आहे. कथानक भोंगळ वाटतं, उपकथानकं त्याची वांडगुळं तर आर्यमदिरा मंडळाचे प्रवेश, ही ठिगळं. फालतु पात्रांना भलताच भाव न् वाव मिळतो. भाषा बऱ्याच ठिकाणी कृत्रिम वाटते. विनोद बाष्कळ अन् शब्दनिष्ठ. घटना दैवनिर्मित आणि असंभाव्य. स्वभावचित्रण अतिरंजित आणि विसंगत. व्याख्यानबाजी रसहानि करते. नाटकाच्या हेतुबद्दल गडकऱ्यांच्याच मनात गोंधळ. हे धड शोकनाट्य नव्हे नि धड भीषण नाट्यहि नव्हे. असलंच तर त्याला भव्यता (Tragic grandeur) नाही.

वाचकहो, पाहिलीत ही दोषांची लांबलचक जंत्री ? ही पाहिल्यावर कुणालाही वाटावें की, हे नाटक टाकाऊ असले पाहिजे. पण चमत्कार असा की रंगभूमीवर त्याचा पहिला प्रयोग झाल्या दिवसापासून मराठी प्रेक्षकांनी त्याला उचलून जे डोक्यावर घेतले ते आजतागायत तसंच आहे. प्रेमसंन्यास आणि राजसंन्यास या नाटकांनी रंगभूमीवरून केव्हाच संन्यास घेतला. पुण्यप्रभावाचाहि प्रभाव फारसा राहिलेला नाही. भावबंधनाला भाव असला तरी तो मंदीचाच. पण एकच प्याला मात्र गडकऱ्यांच्या मागे आज पन्नास वर्षं सतत लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झालेला आहे. त्याचे प्रयोग अजूनही हाऊस-फुल होतात. या नाटकाच्या पहिल्या आवृत्तीच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रस्तावनेत, कै. वि. सी. गुर्जरांनी "हे नाटक गडकऱ्यांनी स्वतःच्या अनुभवावरून लिहिलं आहे" असं लिहून गडकऱ्यांच्या मद्यपानाची लोकांना आठवण करून दिली आणि आपल्या मित्राचा "या कानापासून त्या कानापर्यंत गळा कापला" असं आचार्य अत्रे रागाने म्हणतात. हे म्हटल्यान मात्र गडकऱ्यांच्या मद्यपानाची (व्यसनाची नव्हे) अत्र्यांनी लोकांना उगीचच आठवण करून दिली. मराठी रसिक ती गोष्ट केव्हाच विसरले होते. गडकऱ्यांच्याच एका कवितेत थोडासा बदल करून मी म्हणेन– "मधुकर रसिका, मधुपान ते आता कवणा स्मरत असे? एकच प्याला परि तो तन्मणि सरस्वतीच्या कंठि वसे."

हे नाटक पाहताना हळुवार मनाच्या सुशिक्षित स्त्रिया तर ढसाढसा रडतातच पण रसिक पुरुषवर्गही रुमालानं डोळे टिपीत असतो. एकदा रडून घेतल्यावरही अशी माणसे ते नाटक पुनःपुन्हा पहावयास जातात. एकच प्याल्याचे आपण एकसष्ट प्रयोग पाहिल्याचा विक्रम एका ज्येष्ठ साहित्यिकान नुकताच आपल्या एकसष्टीच्या सत्कार समरंभात बोलून दाखविला !

म्हणजे वधूपरीक्षेच्या वेळी पाहिलेली मुलगी घरातील वडील मंडळींनी तिची निरनिराळी व्यंग पुढं करून नाकारावी आणि नवऱ्यामुलाने मात्र नेमकी तीच पसंत करावी आणि तिच्याबरोबर गुण्यागोविंदाने संसार करावा तसं हे झालेलं आहे. आणि मग वराचं वरकरणी अभिनंदन करणारी मंडळी मनात जसा प्रश्न विचारतात, काय बुवा, हिच्यात ह्यानं अस काय पाहिलं ?" तसाच प्रश्न आपणही विचारू लागतो, "खरंच, एकच प्याल्यात या असंख्य प्रेक्षकांनी असं काय पाहिलं ?"

कशात आहे या नाट्यकृतीचं अमरत्व ? भाषा, पात्र, प्रसंग, रचना, स्वभाव, कथानक अशी हिची अंगप्रत्यंग तर मान्यवर टीकाकारांनी सदोष ठरविली आहेत. आणि तरीही या नाटकानं जनमानसाची घट्ट पकड घेतलेली आहे. तर मग या सर्व लक्षणांपेक्षा "निराळं" असं काहीतरी या नाटकात असलं पाहिजे, की ज्यामुळे त्याला अविनाशी सौंदर्य प्राप्त झालेलं आहे. त्या "निराळयाचा" शोध घेण्याचा अल्पसा प्रयत्न मी या प्रकट चिंतनात करणार आहे.

"नाट्यशास्त्र" विषयाच्या अभ्यासकांच्या मते नाटकाच्या यशाचे मुख्य गमक (या शब्दाला अलिकडे एक नवी चमक आलेली आहे !) त्यातील नाट्य हे होय. पाश्चात्य टीकाकार देखील "Play is the Thing" असंच म्हणतात. हे नाट्य कोणत्यातरी संघर्षातून उभं राहतं. म्हणजे संघर्ष हा नाट्याचा आत्मा असतो. मग तो वृत्तींचा, प्रवृत्तींचा, तत्वांचा, व्यक्तींचा, ध्येयांचा, निष्ठांचा, आकांक्षांचा अथवा जीवनमूल्यांचा, कशाचाही असो. पण संघर्ष हवाच. त्या शिवाय ते नाट्य प्रेक्षकांच्या मनाची पकड घेऊ शकत नाही हा संघर्ष, "तुझं नि माझं जमेना परि तुझ्यावाचून करमेना" असा हलका फुलका असला तर त्यातून "संशय कल्लोळ" किंवा "खडाष्टक" यासारखी विनोदी सुखांतिका (Light Comedy) निर्माण होते. पण तोच जर असा "जगावं की मरावं," किंवा "पातिव्रत्य की सौभाग्य" गंभीर अन् अटीतटीचा असला तर त्याला "हॅम्लेट" किंवा "पुण्यप्रभाव" या सारख्या शोकनाट्याचं स्वरूप येतं. या संघर्षानं जेवढी वरची पातळी गाठली असेल तेवढी नाटकाची भव्यता नि परिणामकारकता अधिक. अलीकडचे उदाहरण द्यायच तर श्री पुरुषोत्तम दारव्हेकर याच्या "कट्यार काळजांत घुसली" या लोकप्रिय नाटकाच देता येईल. त्यात एकुलत्या एक कन्येवरील प्रेम आणि घराण्याच्या गायकीचा अभिमान या दोन निष्ठांचा संघर्ष अति उत्कट आणि उदात्त पातळीवर नेल्यामुळेच प्रेक्षकाना ते नाटक जागच्या जागी खिळवून ठेवतं.

आचार्य अत्रे म्हणतात, "एकच प्याला हा भीषण नाट्याचा एक उत्तुंग इमला आहे. प्रेक्षकांच्या मृदुभावना ठेचून, भरडून, ढवळून काढणारं येवढं प्रभावी नाटक मराठीतच काय पण दुसऱ्या कोणत्याही भाषेत नसेल." तर मग कोणत्या उत्कट आणि उदात्त संघर्षामुळे त्याला हे सामर्थ्य प्राप्त झालेलं आहे ? अत्र्यांच्या मते पतीचं व्यसन विरुद्ध पत्नीची निष्ठा अथवा अतिरेकी दारुबाजी वि. अतिरेकी पातिव्रत्य असं या संघर्षाच स्वरूप आहे. खांडेकरांचीही अशीच कल्पना आहे. फरक इतकाच की सिंधूचं पतिप्रेम हे भक्तीच्या पायरीवर जाऊन पोचल्यामुळे तिच्या पतिव्रत्याला ते अतिरेकी म्हणत नाहीत.

एकच प्याल्यातील संघर्ष याहून खूपच भव्य आणि उदात्त असून त्याचे स्वरूपही जरा वेगळं आहे असं मला वाटतं. सॉमरसेट मॉमने आपल्या आत्मचरित्रात एका ठिकाणी पॅरिसमधील प्रसिद्ध लक्झेंबर्ग या चित्रदर्शनीच (Picture Gallery) मोठ सुरस वर्णन केलं आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेथील चित्रांपैकी लिओनार्डो डा व्हिन्सी या जग-विख्यात चित्रकाराच्या एका कलाकृतीनं त्याचं लक्ष विशेष वेधून घेतलं, चित्राचं नाव आहे Beauty And The Beast. (सौंदर्य आणि सैतान). त्यात आहेत दोनच आकृती. एक अत्यंत सुंदर, सतेज, शांत, निष्पाप गुलाबाप्रमाणे टवटवीत चेहऱ्याची नवयौवना; आणि दुसरा तिला खेटून तिच्या खांद्यावर कामवासनेनं आपला पापी हात ठेवू पाहणारा एक हिडीस, अक्राळ विक्राळ, क्रूर नरराक्षस– त्याच्याकडे वळलेल्या तिच्या निर्भय चेहऱ्यावर सात्विक, सोज्वळ, मृदु अन् मधुर भावनांची अशी काही दिव्य प्रभा फाकलेली आहे की ती पाहून त्या राक्षसाचा क्रूरपणा लुप्त होऊन त्याच्या चेहऱ्यावर मंद स्निग्ध हास्यरेषा उमटलेल्या दिसतात आणि आपला थरथरणारा हात तो चपापून मागं घेत असल्याचा भास होतो. निर्भय, निरागस अन् पवित्र सौंदर्याच्या सान्नि-ध्यात क्रूर श्वापदाचं मानवात परिवर्तन होते असं दाख-विण्याचा चित्रकाराचा हेतु असावा आणि म्हणून माझे डोळे पुनःपुन्हा त्या चित्राकडे वळतात असं मॉम सांगतो. "मॅजिशियन" या त्याच्या जगप्रसिद्ध कादं-बरीत, आपल्या अतिमानुषी मंत्रशक्तीनं एका सुंदरीचा "आत्मा" आत्मसात करू पाहणारा नरराक्षस ऑलिव्हर हॅडो त्यानं या चित्रावरूनच रंगविला असावा.

बायबलमध्ये अशी एक कथा आहे की ईश्वरानं या भूतलावर पहिला पुरुष मानव ॲडम या नावाचा निर्माण केला. पण तो एखाद्या जंगली पशूप्रमाणे रानावनांत निस्संगपणानं भटकू लागला. जगरहाटी चालू करण्याचं त्याचं लक्षण दिसेना. तेव्हा त्याला माणसाळविण्यासाठी त्याच्या एका बरगडीपासून (डावी की उजवी, आणि कितवी, हे सांगितलेलं नाही !) ईव्ह नावाची पहिली सुंदर स्त्री बनविली. तिनं आपल्या नैसर्गिक गुणसंपदेच्या जोरावर ॲडमला माणसाळविले आणि मानववंश निर्मि-तीच्या विघायक (!) कार्याला जुंपले. शारीरिक साम-र्थ्याची उणीव सव्याज भरून काढणारी तिची गुणसंपदा म्हणजे एक "लताकुंजच" होय. निसर्गानं स्त्रीला बहाल केलेल्या कोमलता, सरलता, तरलता, मृदुलता, चंचलता, भावनाशीलता, सहनशीलता इत्यादि मधुर न् नाजुक स्वभावछटा म्हणजेच या "लता" ! पुरुष हा जात्या पशूच. त्याचं सदाचारी मानवात रुपांतर करण्याची अवघड कामगिरी स्त्री आपल्या या नाजुक अस्त्रसंभा-राच्या जोरावर या जगात अनंत कालापासून पार पाडीत आहे. म्हणूनच मॉमनं तिला Domesticating Angel म्हणजे माणसाळविणारी देवता म्हटल आहे. हिटलरच्या सान्निध्यात इव्हा ब्राऊन ही त्याची सुंदर प्रेयसी नसती तर त्याचं केव्हाच हिंस्त्रश्वापदात रुपांतर झालं असतं असं इग्लंडचा पंतप्रधान चर्चिल यानं आपल्या युद्ध-स्मरणिकेत एका ठिकाणी लिहून ठेवलं आहे या संदर्भात कवि माधव ज्यूलियन यांच्या पुढील काव्यपंक्ती लक्षात ठेवण्यासारख्या आहेत.

देवा स्त्रीहृदयीं मनोरमपणा केव्हा कुणी ओतिला
त्याची शांत सुखानुभूति न कधी जाईल चित्तातुनी

* * * *

ज्ञाने व्यास तपोबलावरि जरी ब्रह्मर्षि झाला तरी
स्त्रीप्रेमाविण जन्म नीरस उणा काडीवजा भूवरी

एकच प्याला नाटकात सिंधूच्या रूपानं अशी देवता आपल्या डोळ्यासमोर, तिचा " बत्तीस लक्षणी आणि सर्वसद्गुणी" असा पति सुधाकर दारूच्या कचाटयात सापडून पायरी पायरीनं पशुकोटीत जात असता आपल्या अंगच्या दिव्य आत्मिक सामर्थ्यानं त्याचं मानवीकरण करण्याचा अथवा त्याच्या हृदयाचं पुनर्वसन (Resurrection) करण्याचा जो प्राणांतिक प्रयत्न करते त्यामुळं या नाटकातला संघर्ष पॅरिसच्या प्रसिद्ध Beauty and the Beast या चित्राप्रमाणं अति उदात्त भव्य आणि दिव्य झालेला आहे. तो पाहताना प्रेक्षकाचे डोळे दिपतात आणि अंतःकरण विशुद्ध करुण रसान, स्वच्छ सचैल न्हाऊन निघतं.

काही वर्षांपूर्वी नागपूर येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी एका भाषणात एकच प्याल्यातील सिंधूची एक नवी कैफियत सादर केली होती. त्यांच्या मते वरेर-कर म्हणतात तशी सिंधू ही रडवी अन् दुबळी पतिव्रता नव्हे. ज्या प्रकारचं जीवन नियतीनं तिच्या कपाळी लिहिलं ते जगत असताना तिनं आपल्या भारतीय परं-परेला अनुसरून जे विलक्षण आत्मिक सामर्थ्य दाख-विलं आहे त्यामुळेच एकच प्याल्यातील नाटय उदात्त बनलेलं आहे. ते पुढं म्हणतात- (१) जीवनात प्रत्येक व्यक्तीला नियतीचं आव्हान या ना त्या रुपानं स्वीका-रावंच लागतं; (२) ते स्वीकारताना अंतीम जीवन-मूल्यांवरील श्रद्धेच्या पोटीच नानाविध संकटांना तोंड देण्याचं सामर्थ्य व्यक्तीला प्राप्त होतं आणि (३) अशा प्रकारच्या अग्निदिव्यांतून पार पडणाऱ्या व्यक्तीलाच आपल्या आत्मिक बळाचा प्रत्यय येतो. असा प्रत्यय सिंधूच्या ठिकाणी तिसऱ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(हाच कळस-Crisis), ती जेव्हा सकल जगाचा, संसृतीचा पाश तोडून नियतीचं आव्हान स्वीकारण्यास एकटी खंबीरपणानं उभी राहते तेव्हा स्पष्टपणे दिसतो. एकच प्यालयातील नाटयपूर्ण संघर्षाचं जे स्वरूप मला अभिप्रेत आहे त्याच्या बरेच जवळ तर्कतीर्थ एका अंगानं म्हणजे सिंधूच्या बाजूनं आले आहेत.

नाटकाच्या दुसऱ्या अंकापासून अखेरपर्यंत सुधाकराचा सैतानाच्या आहारी पुनःपुन्हा जात असलेला आत्मा मुक्त करण्याची म्हणजेच एका वेताळ पशूचं मानवात परिवर्तन करण्याची सिंधूची धडपड ही एक हृदयपरिवर्तनाची अलौकिक गाथाच आहे. आणि ती सारी आत्मक्लेशाच्या, स्वार्थत्यागाच्या, नि अविचल प्रेमाच्या असामान्य दर्शनानं उजळून निघालेली आहे. टॉलस्टॉयनं आपल्या जगप्रसिद्ध Resurrection नावाच्या कादंबरीत अशाच प्रकारची पण निराळ्या पातळीवरची कथा वर्णिलेली आहे.

हृदयपरिवर्तनाची एक तऱ्हा खुद्द गडकऱ्यांनी पुण्यप्रभाव नाटकात वसुंधरा-वृंदावन संघर्षाच्या रूपानं दाखविली आहे. पण एक तर ती एकदोन प्रवेशांपुरती मर्यादित आहे. दुसरे असे की, वृंदावनाची वसुंधरेचं पातिव्रत्य भ्रष्ट करण्याची लालसा ही त्यानं जाणुनबुजून बाळगलली असून ती सफल करण्याकरता तो नशापाणी न करता अक्कलहुषारीनं कपटकारस्थान योजतो. आणि शेवटी त्याच्या हृदयातला परमेश्वर जागा करण्याकरता वसुंधराही त्याच्याशी अक्कल हुषारीनं शाब्दिक युद्ध खेळते. पुराणात आपल्या मृत पतीचे प्राण यमपाशातून मुक्त करण्याकरता सती सावित्री बौद्धिक डावपेचाचा नियुक्तिवादाचा आश्रय घेते त्यातलाच हा प्रकार ! त्यामुळे हे संघर्ष कृत्रिम वाटतात आणि प्रेक्षकाच्या अंतःकरणाचा ठाव घेऊ शकत नाहीत.

पुण्यप्रभावातल्या नाटयाची ही दुर्बलता गडकऱ्यांनाही जाणवत असली पाहिजे. पुढच्या नाटकात संघर्षाची ही तऱ्हा एकदम वरच्या पातळीवर कशी नेता येईल या विचारात ते निमग्न असतानाच म्हणजे १९१७ या वर्षांतच या देशात एक असा क्रांतिकारक लढा महात्मा गांधींच्या प्रेरणेने लढविला गेला, की त्याच्याकडे सगळ्या जगाचं लक्ष वेधलं गेलं. बिहारच्या चंपारण्य भागातील इंग्रज मळेवाल्याविरुद्ध त्या मळयात राबणाऱ्या शेतकऱ्यांनी दिलेला तो लढा अपूर्व होता. म. गांधींच्या सत्य आणि अहिंसा या आवडत्या सिद्धांतांची तेथे कसोटी लावली. अर्धपोटी, दीनदुबळे, उघडेवाघडे शेतकरी मळयात बसून राहिले. मळेवाल्यांच्या मदतीला आलेल्या गोऱ्या सार्जंटांनी लाठीमार करून त्यांची डोकी फोडली. त्यांच्यावर घोडे घातले, पण शेतकरी हलले नाहीत. त्यांच्या क्लेशाचे निवारण करण्याकरता म. गांधींनी सहा दिवसांचं पहिलं राजकीय उपोषण केलं. इंग्लंडच्या वर्तमानपत्रांतही या अपूर्व नि असामान्य "संग्रामाची" वर्णनं मोठमोठ्या मथळ्यांसह प्रसिद्ध झाली. हिंदुस्तानात तर विलक्षण खळबळ उडून गेली. मळेवाले लवकरच तडजोडीला तयार झाले. हा सारा इतिहास समोर घडताना पाहिल्यावर त्याचा गडकऱ्यांच्या अत्यंत भावनाक्षम मनावर परिणाम झाला असणारच. त्यातूनच त्यांना आपल्या नवीन नाटकातल्या अभूतपूर्व संघर्षाचा धागा मिळाला असावा असं मी म्हटलं तर ते एक विक्षिप्त धाष्टर्य म्हणून त्याची उपेक्षा होऊ नये. गडकऱ्यांच्या प्रतिभेची करामत मात्र अशी अजब की, सुधा सिंधुमध्ये चालणाऱ्या दिव्य संघर्षावरच सबंध नाटकभर प्रेक्षकाचं चित्त सतत खिळून राहतं आणि ते दुय्यम पात्रं आणि त्यांच्या हालचाली यामुळे अजिबात ढळत नाही.

या संघर्षानं अगदी वरची पातळी गाठावी याकरता सुधाकर आणि सिंधु या पात्रांची घडणच विशेष प्रकारानं केली आहे. सुधाकर अत्यंत बुद्धिमान पण मानी, कर्तबगार पण अतिरेकी वृत्तीचा, तरल कल्पनाशक्तीचा पण महत्वाकांक्षी, सुसंस्कृत पण तापट, आणि बहुश्रुत पण अविवेकी अशा स्वभावाचा आहे. उलट सिंधु ही सुंदर, सुकोमल, सुज्ञ, आर्जवी पण करारी, चतुर पण गोड भाषण करणारी, पतीला दैवत मानण्याइतकी बाळबोध वळणाची, अत्यंत सहनशील, शालीन, पतीच्या सुखाकरता सर्वस्वाचा होम करण्यात धन्यता मानणारी पण स्वतःच्या संसारात संतुष्टपणानं, स्वाभिमानानं जगण्याची जिद्द बाळगणारी अशी लाखातली एक पत्नी आणि वत्सल माता आहे. जो संघर्ष नाटयाकरता उभा केला आहे त्याकरता या प्रमुख पात्रांच्या स्वभावाची घडण अशीच असायला हवी होती हे कोणत्याही रसिक न चोखंदळ प्रेक्षकाला पटेल. व्यसनी नवऱ्याला ताळ्यावर आणण्याकरता सिंधूनं हातात खेटरं घ्यावयास हवी होती असं वरेरकर म्हणतात. म्हणजे प्रस्तुत नाटकातलं मर्म त्यांना समजलेलंच नाही असं खेदानं म्हणावं लागतं. सिंधूकडून अशा प्रतिकाराची अपेक्षा करणं हे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चांदण्यानं अंग शेकण्याचा अट्टाहास करण्यासारखंच आहे !

सुधा–सिंधूच्या सुखी संसाराचं विलोभनीय दर्शन पहिल्या अंकात नाटककाराने घडविलेले आहे. घरातला सोफा सेट, टेलिफोन अन् कारकून, तमंच रामलालला पोचवायला जाण्यासाठी टांगयाऐवजी सांगीतलेल्या फैटणी, सुधाकराची सुस्थिती दाखवितात; त्याची वकीली उत्तम चालत असली पाहिजे. सिंधू एका वाळवोध पण श्रीमंत खानदानी कुटुंबात जन्मलेली एकुलती एक मुलगी अत्यंत विनयशील, कोमल, स्निग्ध भावनांची मूर्ति. कुलीन पणाच्या सर्व मर्यादा पाळून आल्या गेल्याचे हास्यवंदनानं स्वागत करणारी गृहिणी. पडदा उघडताच सुधाकर तिला नावानं हाक मारतो तेव्हा " हे काय आपलं मलतच ; नावानं हाक मारीत सुटायच ? " हे तिचे उद्‌गार तिच्या घरचं वळण दाखवितात. सुधाकराचा स्वभाव जरा थटटेखोर आहे. रामलाल परदेशी जाणार म्हणून आधीच तिच्या हृदयाला हुरहूर लागलेली. त्यात जेव्हा तो म्हणतो, "कुणी सांगावं, कदाचित ही आपली शेवटची भेट असेल." तेव्हां तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात. तेव्हा सुधाकर रामलालला म्हणतो, " तू संसार सोडून भटकणारा वैरागी. तुला कसं समजाव की तरुण प्रेमी स्त्रीपुरुषांच्या संबंधात ऋतुमान कायम टिकून राहत नसतं ? एवढा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टींची धरणे बांधून या गंगा-यमुना मी थोपवून धरल्या होत्या. तुझ्या या कठोर भाषणामुळे झाला त्यांचा मुक्त संचार सुरू. अरे, पुरुष पराक्रमी असला तर तो सात समुद्र सहज ओलांडू शकेल. पण या दोन पवित्र नद्या ओलांडून जाणे आजपर्यंत कोणत्याही पुरुषाला शक्य झालं नाही. " थट्टेच्या भरात आपला नवरा विनयशील संभाषणाची मर्यादा ओलांडीत आहे असं दिसताच सिंधु त्याला अडवते, " आमच्या येथे थट्टेला काही काळवेळ नाही एक गंगा यमुना सापडायची खोटी. लगेच सर्वांसकट वाहून जायची तयारी. "

सुधाकराच्या स्वभावातले अतिरेकीपणा अन् मनस्वीपणा हे दोष जे पुढे त्याच्या सर्वनाशाला कारणीभूत होतात त्यांवर तिनं किती खुबीनं बोट ठेवलं आहे ? या सुखी संसारावर पुढं येणारं संकटांचं सावट देखील या अंकात स्पष्टपणे सूचित झालेलं दिसते. " भाई हिचे समाधान करणे मोठे कठीण काम आहे. मला वाटतं तू गेल्यावर वकिलीची सनद मोडून देऊन हात एक उद्योग मला करीत बसावं लागणार; " हे सुधाकराचे शब्द काय अनर्थ घडणार त्यांची पूर्वसूचना देतात. सुधाकर म्हणजे या अफाट जनसागराच्या तळाशी सापडलेलं एक अमूल्य रत्न आहे. अशी रत्नं लाभणं कठीण अन लाभल्यावर त्यांना हाती ठेवणं त्याहून कठीण" " असा इशारा जाता जाता सिंधूला देऊन रामलाल पुढं सल्ला देतो, " चतुर मुली, त्याच्या अफाट बुद्धिमत्तेला पुरून उरणाऱ्या कामगिरीत त्याला सतत गुंतून ठेव. " ही जबाबदारी पार पाडतांना पुढं कोणत्या आव्हानाला तोंड द्यावं लागणार आहे याचीहि कल्पना सिंधूला आणि तिच्याबरोबर प्रेक्षकाला सुधाकराच्या पुढील उद्‌गारावरून मिळते; " देवाची मर्जी असली तर भाई रामलाल तुफानी महासागर देखील ओलांडून सुखरूप परत येईल पण प्रभूची कृपा फिरली तर महासागर नको, तलाव नको, नदी नको, इथं तुझ्या डोळ्यादेखत तुझ्या आटोकाट प्रयत्नांना न जुमानता तो सामर्थ्यवान प्रभु मला एखाद्या लहानश्या प्याल्यात बुडवून टाकील. " आणि नेमक्या याच वेळी झालेल्या तळिरामाच्या प्रवेशाने ती स्पष्ट होते.

तिसऱ्या प्रवेशात किंवा आपल्या भावाबरोबर माहेरी जायला निघते तेव्हा दुःखाबरोबर एक प्रकारच्या गूढ भीतीमुळे तिचं पाऊल निघत नाही. मागे झालेलं सर्व संभाषण तिला आठवतं आणि सुधाकरला सावध करण्याकरता त्याची ही संरक्षक देवता (Gradion Angel) त्याला विचारते, " भाईनं सांगितलेलं लक्षात आहे ना ? इकडे एकटं राहायचं. वन्स देखील जवळ नाहीत. माझ्या जिवाला अगदी टांगल्यासारखं होईल, " यावर तो तिला लगेच म्हणतो, " या जगात तुझ्याखेरीज अशी एकही गोष्ट नाही की जिचा या सुधाकरला मोह पडेल ...."

वेध तुझा लागे सतत मनी ;
वसतिच केली नामें वदनी

हे अभिवचन घेऊन काहीशा निर्धास्त मनानं चतुर सिंधु बाळंतपणाकरता माहेरी जाते.

ती जाते आणि तिची क्रूर कसोटी पाहणाऱ्या नियतीचा पहिला फासा पडतो. कोणत्यातरी मुद्द्यावर कोर्टात मुनसफाशी सुधाकराची बोलाचाली होते. सहकारी कुचेष्टेनं हसतात. प्रतिस्पर्धी हेटाळणी करतात. त्याबरोबर सुधाकर संतापतो ; त्याचा तोल जातो आणि कोर्टाला होय नव्हे वाटेल ते बोलतो. मुनसफ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याची सनद सहा महिन्यापुरती रद्द करतात. अपमानानं पेटलेला सुधाकर घरी येतो. सांत्वन करायला घरात कोणीच नसतं सदन रद्द झाल्याचं त्याला दुःख वाटत नाही थोड्या अहंकारनं तळिरामाला म्हणतो, "कुबेराची संपत्ती मी लाथेनं झुगारून दिली असती आणि हातानी पुन्हा ओढून आणली असती. पण हलकटांनी हेटाळणी करावी, वैऱ्यांनी खदखदा हसावं या अपमानाच्या जाचण्या सहन होत नाहीत रे, प्राण जाई पर्यंत या सर्पदंशाच्या वेदना चालू राहणार. छे छे नुसती आग भडकून तळमळ चालली आहे." त्याच्या अतिरेकी स्वभावास अनुसरून तो एकदम आत्महत्येचा विचार करतो. पण डोळ्यासमोर सिंधूची मूर्ति उभी राहते. देहरुपान तिला अंतरण्याची कल्पना सहन होत नाही. तेव्हा अगतिक होऊन ताळिरामला विचारतो, "शरीराचा नाश केल्यावाचून मरणाची जोड देणार एखाद विष नाही का ?"

"अस विष नाही, पण अमृत आहे" अस म्हणून दारूनं भरलेला पहिला प्याला तळीराम त्याच्या हातात देतो.

विनाशाच्या वाटेवर पहिलं पाऊल टाकण्यापूर्वी "सिंधू काय म्हणेल ?" या विचारानं सुधाकर क्षणभर थबकतो पण "जरा आराम वाटण्याकरता औषध म्हणून एवढीशी दारू घेतल्यामुळे तिचं व्यसन जडेल अशी नादानपणाची धास्ती बाळगणारे तुम्ही नाही" असं तळीरामणे त्याच्या अहंकारी अभिमानाला आवाहन करताच तो ओठाला पेला लावतो आणि मद्यपानाची पहिली पायरी जी संमोहावस्था तिच्यात जाणूनबुजून प्रवेश करतो.

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी रामलालच्या तारेप्रमाणं सिंधु आपल्या नवजात बाळाला घेऊन घाईघाईनं परत येते. इकडे वसुधा तल–रमणीय सुधाकर व्यसनघनतिमिरी बुडत जातो. बायकोशी त्याचा लपंडाव सुरू होतो. आपल्या संसारावर काही तरी संकट आलेल आहे अस सिंधूचं मन तिला ग्वाही देतं. ते नाहीसं व्हावं म्हणून "प्रणत नाथ रक्षि कान्त" अशी ती देवाजवळ मनोमन प्रार्थना करते. वास्तविक संसाराच्या वेलीवर सुंदर फूल उमललेलं असतं. पण सुधाकराला त्याचं असावं तितकं कौतुक नसतं नवीन संसारात तरुण प्रेमळ पत्नीला हेच मोठं शल्य वाटत. पहिला चिमणा राजसराजा म्हणजे पतिराजांना तिनं दिलेला मोठा नजराणा. त्याचं असं थंड स्वागत पाहून झालेली तिच्या जिवाची उलघाल "दया छाया घे निवारुनिया; प्रभु मजवरी कोपला" या पदात ती व्यक्त करते

आर्यमदिरा मंडळात सामील झाल्यामुळे सुधाकरातला" माणूस लुप्तप्राय झालेला आहे, असं पाहून नियती आपला पुढचा फासा टाकते. सुधाकरचे दारुडे दोस्त त्याचा अहंकार फुलवितात. मनदबंदीची मुदत संपल्यावर, "हेटाळणीपूर्वक हसणाऱ्या दुष्मनांची मेटरांनी पूजा बांधण्याकरता कोर्टात दारू पिऊनच हजर व्हा" या त्यांच्या चिथावणीला प्रतिसाद म्हणून तो चिक्कार पितो आणि म्हणतो "सनद कायमची गेली तरी बेहत्तर." यावेळी रामलाल तिथं भगीरथबरोबर येतो. त्याला देशभक्तीचे डोस पाजून व्यसनापासून परावृत्त करतो. पण "जो या नगराची केवळ शोभा" असा त्याचा मित्र पूर्णपणे पशुकोटीत गेल्यामुळे त्याच्याकडून स्वतःची शोभा करून घेण्याची रामलालची हिंमत होत नाही.

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी विचारी सिंधु आपल्या बाळाच्या कोडं कौतुकांत दंग झालेली दिसते. 'घा ग घेरे तान्हया बाळा' या मधुर गीतानं बाळाची समजावणी करीत बोंडल्यानं त्याला दूध पाजू लागते. पण तो दांडगाईनं बोंडलं उपडं करतो. तेव्हा त्या गुलामाला शरदच्या स्वाधीन करीत म्हणते, "वन्स, सभाळा बाई तुमचं हे रत्न. तुमची माणसंच भारी अचपळ." नवऱ्याला अप्रत्यक्षपणे घेतलेला हा एवढाच गोड चिमटा ! बस्. सिंधूची मजल एवढीच. बाकी सबंध नाटकात ती नवऱ्याला अपशब्द तर राहोच पण तोंडावाटे "दारू" हा शब्द देखील उच्चारीत नाही. ठरल्याप्रमाणे कचेरीत धिंगाणा घातल्यामुळे सनद कायमची गमावून सुधाकर मद्यपानाच्या पुढच्या म्हणजे उन्मादावस्थेत झोकांड्या खात घरी परत येतो ते पाहून कुसुमकोमल सिंधू वादळानं उन्मळून पडलेल्या केळीसारखी धाडकन कोसळते !

तिसऱ्या अंकातला चवथा प्रवेश हा या नाटकाचा कळस (Crisis) होय. कारण यात सुधाकर अधोगतीच्या पायऱ्या झपाझप उतरत शेवटी अघोर वेताळ पशु बनला. या प्रवेशात दारूबरोबरच संशयाचं हलाहल त्याच्या काळजात कोंबण्याचं काम तळीराम करतो. ऑथेल्लो नाटकातल्या अयागोप्रमाणं छद्मी भाषणानं तो आपल्या घऱ्याचा मत्सराग्नी भडकावून देतो. त्याच्या मानबिंदूला वारंवार दंश करतो. म्हणतो, "अहो दादासाहेब, तुमची या घरात आता काय किमत राहिली आहे ? तुम्ही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोण ? हे घर तुमचं नाही. रामलालचं आहे. पद्माकर आता तुमचा खर्च चालवितो. बाईसाहेब त्यांना अनुकूल. सगळयांनी संगनमत करून आज पद्माकरला तार केलीय. तो येऊन तुमचा बंदोबस्त करणार. दारू बंद होणार.

या फुत्कारांनी सुधाकराचा अंगार फुलला म्हणजे तो सिंधु आणि शरद या दोघींना समोर बोलावून गुरगुरत त्यांच्या देखत तळिरामकडून दारूचा पेला घेतो. पशुत्वाची एक पायरी तो खाली उतरलेला आहे. शरद रागानं तळिरामला म्हणते, "तू अगदी नरपशू आहेस." त्याबरोबर तळिराम कांगावा करतो, "दादासाहेब, तुमच्या बायकांनी आम्हाला खेटरं दिली. बायकोच्या गळयातलं मंगळसूत्र तोडणारा मर्द मी." त्यावरोबर आणखी एक पायरी खाली उतरून सुधाकर बेफामपणानं फर्मावितो, "सिंधूच्या गळयातलं मंगळसूत्र तोड."

तळिराम राक्षसासारखा सिंधूवर तुटून पडतो आणि तिच्या मंगळसूत्राला हात घालतो. ती असहाय्यपणे देवा, भाई" असा धावा करते. पूर्ण पशु झालेला सुधाकर तिला दरडावतो "हं, खबरदार. मान कापीन." तेवढयात पद्माकर येतो आणि तळिरामाला लाथेनं उडवतो मग काय ? त्या राक्षसाच्या तोंडाला ताळतंत्रच राहात नाही. सरळ सुधाकराच्या कानात गरळ ओकतो, "तुमची सनद गेली तेव्हा रामलालनं बाईसाहेबांना मिठी मारली." आता सुधाकरातला पशु बेफाम होतो आणि बाबासाहेब, रामलाल, पद्माकर यांना तोंडाला येईल ते बोलतो आणि म्हणतो "चालते व्हा, माझ्या घरातून." तेव्हा पद्माकर सिंधूला म्हणतो, "हा तर बेताल अनर्थ आहे. चल, ताई या घरात आता पाणी प्यायला सुद्धा राहू नकोस. या नरकांतून बाहेर पड."

कोणतं संकट आ वासून आपल्यापुढं उभं आहे याची सिंधूला स्पष्ट कल्पना येते. एका दुतोंडी अजगराच्या विळख्यात सापडून सुधाकर पशु बनत चाललाय हे स्पष्ट दिसतं. तेव्हा या परिस्थितीशी मुकाबला करण्याचा ती अबला पक्का निर्धार करते. तिला भय वाटत नाही अन् ती आसवंही ढाळत नाही. आपल्या भावाला सडेतोड प्रश्न करते, "दादा, हे पाय सोडून मी कुठं जाऊ ? कशी या त्यजू पदाला ? तुमच्या चौदा चौकड्यांच्या राज्यात राहून रौप्याची राणी होण्यापेक्षा दुर्दैवाची दासी होऊन इथं दुःखांत दिवस काढीन. जिथं हे पाय असतील तिथच माझा स्वर्ग." असं म्हणून सुधाकराच्या पायावर डोकं ठेवते. तो मस्तवालपणानं लाथ मारतो. पण ती क्रोधाच्या आहारी जात नाही. उलट करुणा भाकते, "लोटू नका कान्ता केवि जगे दीना मीना जल लव रहिता ? वेंकुंठेश्वरा माझ्या कपाळीच्या कुंकवासाठी या पायधुळीत मला राहायला नको का ?

कोणत्याही विवाहित सुजाण पुरुषाच्या काळजाला हात घालणारे त्याच्या पत्नीचे हे शब्द त्यांच्या पाठीशी नादान नवऱ्यालाही वाऱ्यावर न सोडण्याचा तिचा निर्धार. सुधाकरातला पशु किंचित् हलतो आणि म्हणतो, "या चोरांच्या घरातला एक पैसासुद्धा माझ्या घरात येता कामा नये. असं असलं तर रहा. कबूल आहे ? नुसत्या तुझ्या गंगायमुना नकोत." याच गंगायमुना ओलांडून जाणं काही दिवसापूर्वी त्याला अशक्य वाटत होतं हे प्रेक्षकाला आठवतं आणि सुधाकरातला माणूस कसा नष्ट झालेला आहे ते लक्षात येत. तळिराम ओरडायला लागतो, "हॅम्लेटच्या बापासारखा इशारा देतो आहे, बाईसाहेबांना शपथ घ्यायला लावा. शपथ घ्या बाईसाहेब शपथ–"

सुधाकरातला माणूस थोडा जागा होऊन दरडावतो, "त्रस्त समंधा शांत रहा. "सिंधु त्याच्या पायावर हात ठेवून शपथेचा उच्चार करते, "आपल्या दोघांच्या कष्टाविरहित जगांतली सारी धनदौलत आजपासून मला शिवनिर्माल्य आहे. "वित्त पराजित मानो विषसम। स्पर्शिन ना कवि मी त्याला."

पतीच्या ठिकाणी निर्माण झालेली माणुसकीची धुगधुगी पाहून तिचं मनोधैर्य दुणावतं. हे resurrection पुरं करण्यासाठी मला आणखी थोडं सहन केलं पाहिजे याची जाणीव होते पद्माकर जेव्हा म्हणतो, या रौरवात राहून आयुष्याची राखरांगोळी का करून घेणार आहेस?" तेव्हा ती ताडकन् सवाल करते, राखरांगोळी? राखरांगोळी काय म्हणून? माझ्या "देवासाठी (की जो मला प्रयत्नानं परत मिळवायचाच) मी जळून मेले तर काय माझी राखरांगोळी होईल ? दादा, बाबा, तुम्हाला वेडं तर लागली नाहीत ? सुखाच्या संसारात देखील चार दिवस माहेरी राहायचं आम्हा बायकांच्या जिवावर येतं. आता तर इकडची ही अवस्था झालेली. घरात हा प्रकार. मला डोळयात तेल घालून जगायला नको का ?"

पद्माकराला हे समजत नाही. तो रागानं बोलतो, कुबेराला कर्ज देण्याइतका धनत्तर तुझा बाप, कोसळत्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आकाशाला थोपवून धरणारा डोंगरासारखा तुझा भाऊ; अन् तू या दिवाण्याद दरवाजासाठी–"

दादाच्या तोंडून हे शब्द निघाले मात्र. पतिव्रतेच सारं आत्मिक तेज उफाळून वर येतं. ते पाहून तिच्या आप्तांचे डोळे तर दिपतातच. पण प्रेक्षकांचेही. ती आपल्या भावाला पुढे बोलू देत नाही. म्हणते "हं दादा, या घरात, या पायासमोर असं अमंगल मी बोलू देणार नाही. पतिव्रतेच्या कानांची ही अमर्यादा आहे. जा, बाप भाऊ, माझं या जगात कोणी नाही. पतिव्रतेला नातीं नसतात ती भावाची बहीण नसते, बापाची मुलगी नसते–" तेजस्वी, करारी, आणि स्वाभिमानी सिंधु वन्संना देखील दुसरीकडे पाठवून देते आणि आलेल्या दुर्धर संकटाशी सामना द्यायला निर्भयपणानं एकटी उभी राहते. सकल जगाचा, संसृतीचा पाश एका क्षणात ताडकन तोडून टाकते. पतिव्रत्याचं हे दिव्य दाहक स्वरूप दुबळेपणाचं द्योतक खासच नाही.

चवथ्या अंकात युद्धाला तोंड लागलं आहे. सुधाकर आर्यमंदिरा मंडळात बेहोष होऊन लोळत असतो, आणि सिंधु आपला कणीकोंड्याचा संसार काबाडकष्ट करून खंबीरपणानं पण हसतमुखानं चालवीत असते. बाळाशी गोड गोड बोलणं, त्याच कोडकौतुक करणं एवढाच तिचा विरंगुळा. दुसऱ्या प्रवेशांत ती छापखान्यातल्या कागदांच्या घड्या घालण्याचं काम करीत असताना गीता तिच्याशी बोलत असते आणि शुद्धीवर असलेला सुधाकर गुपचुप त्यांच्या मागं येऊन उभा राहतो. हा सर्वच देखावा म्हणजे गडकऱ्यांच्या असामान्य कल्पना-शक्तीचे एक मनोज्ञ शिल्प आहे. दारूबाज नवऱ्याच्या बायकांची ही दोन परस्पर विरोधी हालती बोलती चित्रं सुधाकरला निस्संकोचपणे पहायला मिळतात. देवतातुल्य सिंधु आणि मनाची उदार पण तोंडाची फटकळ गीता. सिंधूची दैन्यावस्था पाहून गीतेचं मन कळवळतं. नव-कोट नारायण जिचा बाप आणि लक्ष्मीशी सारीपाट खेळण्यात जिचा जन्म गेलेला तिला पोटासाठी मोल मजुरीचं दळण दळायला लावावं हे त्या भाबड्या मुलीला सहन होत नाही. दुनियेतल्या सगळ्या व्यसनी नवऱ्यावर ती सात्विक संतापानं यथेच्छ तोंडसुख घेते. तिचा एकेक शब्द सुधाकराच्या अंतःकरणावर चाब-काच्या फटकाऱ्याप्रमाणं बसतो. सिंधु तिची समजूत घालते. "पति हा देवासारखा" क्वचित् घसरलाच तरी स्पर्शमणि जसं लोखंडाचं सोनं करतो तसं पत्नीनं आपल्या अंगच्या विनयानं त्याला पुनः ताळ्यावर आणावं." पण हे ऐकून गीता आणखीच चेकाळते आणि "हे कसले हो असले देव ? अहो हे दारूबाज देव आज गटारात वाहायचे तर उद्या उकिरड्यावर लोळायचे. मेल्या एकाच्या अंगी वकृत्व असेल तर शपथ अन् म्हणे देव"; असं म्हणून शेवटी खुद्द सुधाकरावरही घसरते, "हे हॊने ना चांगले शिकले सवरलेले ? पण आष्टौप्रहर बाटलीत बुड्या मारूनच बसल्या ना यांच्या मोठाल्या बुद्धया ? अहो हे शेंदूर कसो देव. दारू पितो तो कसला हो नवरा ?"

या दगडा धोंड्याच्या भडिमारानं सुधाकरातला मानव खडबडून जागा होतो. तेवढ्यात गीता सिंधूला आठवण करून देते– "अमृतेश्वरी लक्ष भोजनं चार दिवस चालली आहेत. तिथं गेलात तर गोडाधोडाचे दोन घास तरी पोटभर मिळतील." हे ऐकताच सिंधूच्या डोळ्यात टचकन् पाणी येतं आणि सुधाकर कळवळतो. "धिःकार असो तुझ्या व्यसनाला आणि पुरुषार्थाला," अशी स्वतःची निर्भर्त्सना करतो. सिंधु आपल्या फाटक्या लुगड्याचं निमित्त पुढं करून गीतेला नकार देते आणि नवऱ्याच्या दारूबाज अब्रूवर पांघरूण घालते. पश्चा-तापानं पोळलेला सुधाकर उद्वेगानं म्हणतो, "धनसंप-न्नाची जी कन्या, ज्ञानसंपन्नाची जी पत्नी तिच्या उपास-मारीची दया येऊन या अजाण मुलीनं तिला सदावर्ताचा रस्ता दाखवावा हं ? सुधाकरा चांडाळा, दारूच्या दुष्ट नादानं केवळ पशू बनून या देवतेची काय विटंबना केलीस ही !" तोंड झाकून तो रडू लागतो. या क्षणी त्याचं पूर्ण मानवांत परिवर्तन झालेलं आहे. सिंधूनं अर्धा लढा जिंकलेला आहे. त्याला रडताना पाहून ती विव्हल होते आणि "हे काय बरं असं, मनाला उगीच लावून घ्यायचं ?" असं म्हणून त्याची समजूत घालते. तेव्हा तो घोषणा करतो, "आजपासून मी दारू पिणं सोडलं. कायमचं सोडलं." ही तिच्या विजयाची पावती. आनं-दानं ती म्हणते, "अहाहा, असं झालं तर देवच पावला– प्रभु अजि गमला, मनीं तोषला शुभघडीचा हा निश्चय कधी काळी विसरू नये." त्याच्या पाया पडते. हेतु हा की हा युद्धबंदी करार पक्का व्हावा ! "सिंधू सिंधू, काय करतेस हे ? या पातकी सुधाकराचे पाय धरतेस?" असं म्हणून तो पुनः स्वतःची यथेच्छ निंदा करतो. तेव्हा ती अत्यंत मृदु स्वरात त्याला म्हणते, "ऐकलं का ? आता मी नाही आपल्याला असं वेडंविद्रं बोलू द्यायची.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सोडायची झाली ना आजपासून ? झालं तर. झालं गेलं गंगेला मिळाल." यावर सुधाकर चटकन उत्तरतो, "आता हा सुधाकर तुझ्या एकाही शब्दाबाहेर जाणार नाही."

सुधाकरच्या मनाचा कबजा घेणारा पशु पूर्णपणे पराभूत झाल्याची ही ग्वाही मिळताच सिंधूचा आनंद गगनात मावत नाही. आपल्या बाळाच्या चिमुकल्या जीवालाच ही "सोन्याची अक्षरं" सांगून म्हणते "वघितलं का ? या लबाडाला सुद्धा हे ऐकून कसं हसू येतंय ते. बाळ, अरे तू असा स्वस्थ कसा ? पुन: आपल्याला सोन्याचे दिवस लाभणार वरं. स्वस्थ कसा तू ? ऊठ गड्या, आणि टाक उड्या. ऐकलं का, याला एकदा आपल्याच तोंडानं सांगायचं बरं. " यावेळी प्रेक्षकाला मनापासून वाटतं की सिंधूच्या संसारातली काळोखी रात्र संपून सुखाची पहाट उगवली. आता तिला दृष्ट लागू नये.

पण नियतीचा क्रूर खेळ संपलेला नसतो. कारण या नंतर सुधाकर नोकरीच्या शोधार्थ जो जातो तो आपल्या श्रीमंत दारुबाज मित्रांना भेटायला बंड गार्डनवर ! जगाकडे वर डोळे करून पाहण्याचा त्याला धीर होत नाही. त्याच्या नजरेस एक प्रकारचा भितरा ओशाळेपणा आलेला असतो. या सुंदर जगात माझी जागा मला पुनः मिळेल का, असा प्रश्न तो आपल्या मनाला आशाळभूतपणानं वारंवार करतो आणि म्हणूनच की काय, अपरिचित पण सज्जन सद्‌गुणी माणसाकडे मदतीसाठी जात नाही.

प्रथमग्रासे माक्षिकापात व्हावा तशी प्रथम शास्त्रीबुवा आणि खुदाबक्ष ही आर्यमदिरा मंडळाच्या सभासदांची जोडी म्हणजे त्याच्या गतपातकांची मूर्तिमंत पिशाच्चंच त्याच्यापुढं दत्त म्हणून उभी राहतात. त्यांना वाटेला लावल्यावर एकामागून एक असे चार प्रतिष्ठित मित्र भेटतात. पण निरनिराळ्या तऱ्हेनं सगळे त्याचा अपमान अन् हेटाळणी करतात. चौथ्यानं निराशा केल्यावर मात्र सुधाकरचा संयम खलास होतो. अत्यंत वैतागानं तो म्हणतो, "वस्स-दुर्दैवाचे दशावतार पहाण्याची आता माझ्यात ताकद नाही. जिथं कवडी किंमतीच्या कंगालांनी माझी अशी पैंजारांनी पायमल्ली केली तिथं सद्‌गुणी माणसाची सहानुभूति मला कशी मिळणार ?" हा त्याचा निष्कर्ष अर्थातच चुकीचा आहे. ओशाळपणानं भिऊया बनलेल्या मनाला सज्जनापुढं जाऊन दोन शब्द बोलण्याचा धीरच नसतो. त्यामुळं ते मार्ग आपल्याला बंद आहे अशीच एक प्रकारची फसवणूक हे मन करून घेतं. यावेळी त्याच्याजवळ जर रामलाल किंवा सिंधु असती तर त्यांनी कदाचित् त्याची चूक त्याला समजावून दिली असती. पण ते तसं व्हायचं नव्हतं !

अपमानाच्या इंगळ्या डसल्यानं पुन: त्याचं डोकं भणाणून जातं आणि त्याच्या अतिरेकी स्वभावास अनुसरून निराशेच्या खोल गर्तेत आपण होऊन उडी घेत तो म्हणतो, "दारुबाज दोस्तांनी लाथाडलेलं हे थोवाड आता माझ्या उपाशी बाळाला आणि कावाडकष्ट उपसणाऱ्या सिंधूला कसं दाखवू ? बेंवकूब बाप, नालायक नवरा, दीड दमडीचा दारुबाज ! देवा देवा, कशाला या सुधाकराला जन्माला घातलंस ? आता या जगात माझा मित्र एकच. तो म्हणजे मृत्यू कोणत्या रुपातं त्याला सामोरा जाऊ आणि त्याच्या गळ्यात मिठी मारू ? बस्. दारूबाजाच्या ओळखीचं मृत्यूचं रूप एकच. दारू ! प्राण जाईपर्यंत दारू ! होय. तेच आता ठरलं. मुलासकट माणुसकीला, सिंधुसकट संसाराला, सद्‌गुणासकट सुखाला आणि जगासकट जगदीश्वराला या सुधाकराचा निर्वाणीच्या निराशेतला अखेरचा प्रणाम !"

सिंधूनं मिळविलेला विजय इतका अल्पजीवि ठरेल अशी प्रेक्षकांची कल्पना नसते. पण तो तसा ठरला आणि "मरेपर्यंत दारू" या अतिरेकी निर्धारानं सुधाकर पुन: दारूच्या अड्डयावर गेला. दारुबाज आयुष्याची ही प्रलयावस्था त्यानं जाणूनबुजून स्वत:वर ओढवून घेतली आहे. रामलालला तो सांगतो, सिंधूचा हंसरा चेहरा, बाळाशी लडिवाळ संभाषण. दोघांचा तो उल्हास. आमच्या चिमुकल्या जगातला तो शेवटचा आनंद, जाऊ दे या एकच प्याल्यात." आणि पीत सुटतो. त्याचं हे बोलणं विषारी निराशेचं आहे. प्रलयावस्थेत त्याचा आणि दारूचा आता एकजीव झालेला आहे. माणसकीचं मातेरं होऊन तो जन्माचा पुन्हा पशु बनलेला आहे.

चवथ्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशात हा बेरड पशु पुन्हा देवतातुल्य सिंधूसमोर येऊन उभा राहतो. मोलाचं दळण दळताना आपल्या चिमण्या बाळाचं गोड आवाजात गायिलेल्या ओव्यांनी मनोरंजन करणारी ही प्रेमळ पण करारी माता बाळाची समजावणी करीत असते, "अगवाई बाळ, अशा उपाशी आशेनं त्या पिठाकडे काय वर पाहतोस ? अश्वत्थाम्याला त्याच्या आईनं पीठपाणी कालवून दिलं न् त्याची दुधाची तहान कशी

तरी भागविली. पण बाळ, त्यातल्या चिमुटभर पिठावर सुद्धा आपली सत्ता नाही रे. ते लोकाचं आहे, त्या पीठ-पाण्याचा ओघळ तुझ्या तोंडावर पाहिला तर राजसा, तारामतीचा रोहिदास तुला हंसून हिणवायचा नाही का ?" कोणत्याही सहृदय माणसाच्या अंतःकरणाला पीळ पाडणाऱ्या या उद्‌गारांचा बेभान सुधाकरावर अर्थात् काही परिणाम होत नाही. दारूकरता सिंधू पैसे देत नाही या रागावर पतिव्रतेच्या पवित्र कानांनी ऐकू नयेत असे उलटचा काळजातून निघालेल्या शब्दांचे निखारे खुशाल तिच्या कोमल अंतःकरणावर तो उधळतो. "नवऱ्यापेक्षा तुला ते कारटं जास्त झालंय काय ? सिंधू, तू पतिव्रता नाहीस. हरामखोर, ते कारटं रामलालचं आहे."

हे शब्द पतीच्या तोंडून ऐकताच अंगावर वीज पडावी तशी सिंधूची अवस्था होते. तिच्यासत्व परीक्षेचाच हा प्रसंग. नवरा काठी उगारून मारायला धावतोय. हाका मारून चार चौघांना बोलवावं तर "तिकडून काहो तरी भलतचं व्हायचं ही काळजी. पत्नीधर्माचं ते पालन नव्हे. अशा स्थितीत स्वतःच्या फाटक्या अंगाचं पांघरूण घालून ती बाळाचा बचाव करायला बघते. काठीचा तडाखा तिला बसतो. डोकं फुटतं. देवा तूच आता वाचव माझ्या बाळाला' असे उद्‌गार काढून मूर्छित होते. तिच्या कुशीतल्या तान्हुल्यावर दुसरा तडाखा हाणून सुधाकर त्या कोवळया जीवाचा प्राण घेतो. त्याच्या पशुत्वाची ही परिसीमा पाहताच प्रेक्षक संतापान "अरे रे, चांडाळा नरधमा, काय केलंस हे ?" असं ओरडतो आणि सिंधूची सारी तपश्चर्या वाया गेली म्हणून आत्यंतिक निराशेनं सुन्न होतो.

पण पाचव्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशात शुद्धीवर आलेली सिंधू प्रेक्षकाला आपल्या दिव्यत्वानं स्तिमित करून टाकते. तिचा लढा अजून संपलेला नाही. तिनं शरणागति पत्करलेली नाही. सुधाकराचं याही स्थितीत मानवीकरण करण्याची जिद्द बाळगून त्याला पकडायला आलेल्या फौजदाराला ती एक " दिव्य असत्य " (divine lie) सांगते– "यांनी काही केलं नाही साहब. मी दोन दिवसाची उपाशी होते. बाळाला घेऊन जिन्यावरून उतरत होते तेव्हा घेरी आली. जिन्यावरून पडले. पडतांना मूल अंगाखाली चेंगरलं. माझ्या कपाळाला खोक पडली. तशीच रक्तभरल्या हाती काठी टेकीत इथवर आले म्हणून काठीला रक्त लागलं. तिकडचा काही संबंध नाही यात " पुढं रक्तस्रावानं क्षीण झालेल्या आवाजात भावाला विनविते "दादा, ऊठ बरं. चुलीवर थोडा भात आहे. दोन तांबे तिकडच्या अंगावर घालून चार घास खायला घाल. तिकडे कालपासून पोटात काही नाही. " तो त्वेषानं म्हणतो, " याच्या पिंड ब्रह्मांडाचा एकच घास करून काळाच्या उदरात कोंबण्यासाठी मी आलो आहे. " पण हतबुद्ध झालेले फौजदार त्याची समजून घालतात– "भाऊसाहेब प्रत्यक्ष गंगाप्रवाहात पोहणारावर आग पाखडून काय होणार?" रामलालही म्हणतो, "देवाब्राह्मणांच्या सत्यतेपेक्षाही अशा पुण्यशील सतीच्या असत्यालाच परमेश्वरी आशीर्वादानं पाठबळ लाभतं. सिंधू तू धन्य आहेस !"

आपल्या भावाला जवळ बोलावून सिंधु पुन: समजावणी करते, "दादा, आपल्या माणसावर असा राग धरून चालेल का ? माझी जाती घडी सरत आली. असं रत्न मी मागं टाकून जातेय ती तुझ्या जिवावरच ना ? तूच आता उन्हातान्हात त्यांच्या तापल्या जीवावर पदर घालायला नको का ? तुझ्या ताईचं सौभाग्य आता तूच जपून ठेवलं पाहिजेस. लहानपणी, माझ्या कुंकवाला तजेला यावा म्हणून करंडयात मृगाची इवलाली पाखरं तूच आणून ठेवीत होतास. आठवतं ना?" पतिप्रेमानं अथांग भरलेल्या सिंधूच्या विशाल हृदयातून मरता मरता निघालेले हे फत्तराला पाझर फोडणारे बोल वाया गेले नाहीत. पशुत्वानं वेताल बनलेल्या सुधाकराच्या पाषाण हृदयावर त्यांनी खोल जखम केली. पद्माकर जाता जाता सात्त्विक त्वेषानं म्हणतो, त्याच्या अंगावर ओरडतो, "छाकटया सैताना, ऐक ऐक माझ्या लाडक्या ताईचा एक एक बोल. पण छे, तुझे डोळे कुठचे उघडायला ? " तेव्हा शुद्धीवर आलेला सुधाकर तात्काळ उत्तर देतो, " उघडले. भाऊसाहेब माझे डोळे साफ उघडले. पण ते उघडे आहेत तोवर या देवतेच्या जात्या जीवज्योतीच्या प्रकाशात या क्षणीच स्वर्गाचा रस्ता एकदा नीट पाहून ठेवतो."

हे शब्द ऐकताच त्या अत्यंत भीषण प्रसंगातही प्रेक्षकाचा निराशेनं भरून गेलेला ऊर किंचित् हलका होतो. कारण त्या अघोर पण भव्य संघर्षात विजयाचा काटा परत सिंधुकडे झुकत असल्याचा त्याला दिलासा मिळतो. मात्र सुधाकराचे डोळे फार वेळ उघडे राहणार नसतात. दारूनं शेवटचा एकच प्याला भरून त्यात तो रसकापूर नावाचं जलाल विष कालवतो. प्रेक्षकाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मनात पुन: कालवाकालव होते. पण पुढच्या क्षणीच त्याच्या लक्षात येतं की सुधाकरानं केलं तेच बरोबर होतं. कारण सिधूच्या तपश्चर्येनं घडून आलेलं त्याचं Resurrection कायम राहण्याचा तो एकच मार्ग त्याला दिसत होता. मेल्याशिवाय त्याची दारू सुटणार नव्हती. आपल्या ठिकाणी प्रस्थापित झालेल्या माणुसकीवर पशुत्वानं पुन: मात करायला संधी देणं ही देवतेची घोर प्रतारणा ठरली असती.

श्वास निरोधून पुढचं नाटक पहाताना अक्षरश: प्रेक्षकाचे प्राण डोळ्यात गोळा होतात आणि शरीराला असंख्य कान फुटतात. सिंधु पतीला हळुवारपणानं म्हणते, "ऐकलं का ? असं माझ्या जवळ यायचं होतं. माझं मस्तक आपल्या मांडीवर घ्यावें. आपला हात माझ्या हातात द्यावा". तिची ही आज्ञा मानल्यावर हृदयाचं कपाट फोडून बाहेर पडलेले त्याचे दारुण दु:खाचे उद्गार असे आहेत- " सिंधू, देवता स्वरूप सिंधू ! काय तुझी दुर्दशा झाली ही ? पचकन्यांच्या पुण्याईनं स्वर्गाचा संसार करण्याची तुझी योग्यता. पण चौऱ्यांशी लक्ष जन्माची संचितं या जन्मी उभी राहिली आणि विधात्यानं 'सुधाकर" हे दारूनं ओथंबलेलं नाव तुझ्या कपाळी कोरलं ! सिंधू, देवते, मला क्षमा कर. या अनंत अपराधी पातक्याला क्षमा कर."

हे उद्गार ऐकल्यावर पश्चातापानं सुधाकरातल्या पशूचा पूर्ण नि:पात झालेला आहे याची साक्ष सिंधूला मिळते, अगदी अखेरच्या क्षणी का होईना, पण आपल्या त्यागाला, सेवेला, सहनशीलतेला आणि पतिव्रता धर्माला परमेश्वरानं हे पारितोषक दिलं या जाणीवेनं. जाती ज्योत क्षणभर फुरफुरावी, तशा तिचा चेहरा आनंदानं मोहरतो. ज्या कृतार्थतेनं पावनखिडीत शरपंजरी पडलेला बाजी शिवाजीमहाराज विशाळगडी सुरक्षित पोचल्याची तोफ ऐकल्यावर प्राण सोडतात, अगदी त्याच कृतार्थतेनं सिंधु " देवा, सुधाकरांना सुखी ठेव, '' अशी प्रार्थना करीत या जगाचा निरोप घेते. आणि दारूचा विषमिश्रित शेवटचा प्याला पिऊन तो तिच्या पावलावर पाऊल ठेवतो.

मरणापूर्वी त्याला झालेला पश्चाताप आणि आलेला दु:खाचा अनावर उमाळा पुढील शब्दात व्यक्त झालेला आहे. "सिंधु गेली. माझी पुण्याईची सिंधु आटली. दयेची देवता, सुखाची सरिता काल सागराला मिळाली, नव्हे या पापी सुधाकरानं निर्माण केलेल्या दारूच्या महासागराला मिळाली. वामनावतारी देवाला त्रिभुवनाचं माप घेण्यासाठी त्रिविक्रमाच्या रूपानं निदान तीन पावलं तरी टाकावी लागली. पण या सुधाकराचं उभं त्रिभुवन या देवतेच्या दोन पावलांपुरतंच होतं. ही पावलं धरून जसा हिच्या बरोबर गेलो तरच हिच्या पुण्यबलानं माझी पातकं जळून मला स्वर्गापर्यंत पोचता येईल. गेली, दिव्य तपस्विनी मंगलनिधान पुण्यमूर्ति सिंधु गेली. रामलाल, तुझी ताई गेली आणि माझी मानलेली आई गेली."

पशुत्वाचा पूर्णपणे लोप होऊन एका सुशील सहृदय मानवात परिणत झालेल्या सुधाकराचा हा विलाप ऐकून त्याच्याविषयी दयेचा पाझर फुटणार नाही असा माणूस विरळा. सिधूचं बलिदान वाया गेले नाही हीं त्याबरोबरच होणारी जाणीव प्रेक्षकाचा दु:खभार हलका करते. तीन अश्राप जीवांच्या भीषण मृत्यूनं समाप्त झालेल्या या भव्य उदात्त संघर्षाची विलक्षण जादू ही आहे की आपल्या प्रिय पत्नीचो नि लाडक्या बाळाची शीतरक्त [cold blooded] हत्या करणाऱ्या सुधाकराविषयी शेवटी प्रेक्षकाच्या मनातून संताप, उद्वेग, घृणा, चीड हे सारे तामसी विकार कोठच्या कोठे विरून जातात आणि अंत:करणात शिल्लक राहते ती अथांग करुणा. सिंधूच्या आत्मत्यागानं मिळविलेला दिग्विजय असा दुहेरी आहे. सुधाकराचं मानवीकरण पूर्ण करून शिवाय त्याच्याविषयी प्रेक्षकाच्या मनात प्रसंगोपात् उद्भवलेली कठोर भावना नाहीशी करून मगच तिनं प्राण सोडलेला आहे. असा हा अति भव्य, दिव्य आणि उदात्त संघर्ष रंगभूमीवर पाहून हजारो रसिक प्रेक्षकांची अंत:करणं अनंत कालपर्यंत माणुसकीच्या गहिवरानं आणि अनुकंपेच्या आसवांनी द्रवून स्वच्छ निर्मळ होत राहतील. खरोखर, व्यसनामुळे साक्षात् पशु बनलेल्या पतीचं पुन: मानवीकरण करण्यकारता त्याच्या पत्नीला कराव्या लागणाऱ्या संघर्षाचं एक अभिनव अद्भुत आणि अतिउच्च परिमाण (Dimension) गडकऱ्यांनी "एकच प्याल्यात" निर्माण करून ठेवलं आहे.

— ---

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

दक्खिनी हिंदी व तिला मराठीची देन

देवीसींग व्यंकटसींग चौहान, लातूर

मी साहित्यिक नाही. माझे सगळे आयुष्य राजकारणातच गेले. सहा वर्षांपूर्वी राजकारणातून निघाल्यानंतर काहीशा जिद्दीने मराठी, हिंदी, उर्दू, इत्यादींच्या अभ्यासात मी लक्ष घातले. मला यापूर्वी उर्दू चांगले अवगत असल्यामुळे माझे या क्षेत्रातील काम सुकर झाले. गेल्या काही वर्षात काही गोष्टी मी मांडल्या आहेत. त्या वरील तिन्ही भाषा व इंग्रजीतून आपल्यापुढे आलेल्या आहेत. या कणावरूनच मला आपण या ज्ञानपीठात पाचारण केले. त्यात माझ्या विचारांच्या मौलिकतेपेक्षा आपली गुणग्राहता आणि औदार्यवृद्धिच अधिक आहे, याची पुरेपूर जाणीव मला आहे.

परगुणपरमाणून पर्वतीकृत्य नित्यं
निजहृदि विकसन्तः विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ।

या उक्तीची मला आठवण होत आहे. माझा एकही लेख आपल्या या परिसरात उजेडात आला नसतानाही, माझे विचार प्रथमच मराठी विद्वानांपुढे मांडण्याची संधि मला नागपुरात मिळावी, हा केवळ योगायोगच असे मी मानीत नाही.

आपली राष्ट्रभाषा हिंदीच्या अनेक बोलभाषा आहेत. भाषाविज्ञानाच्या दृष्टीने हिंदी ही दिल्ली, मेरठ, बिजनौर, हस्तिनापूर इत्यादींच्या प्रदेशात आम जनतेची बोली असलेल्या खडीबोलीचे विकसित व साहित्यिक रूप आहे. या बोलीला खडीबोली हे नांव दीड शतकापूर्वी दिले गेले. या बोलीला अमीर खुस्रोने (मृत्यु शक १२४७) दिल्लीच्या परिसरातील भाषा असे म्हटलेले आहे. रोशन चिराग या दिल्लीकर लेखकाने (मृत्यु शक १२७८) या भाषेला हिंदुई असे नाव आपल्या फार्सी ग्रंथात दिले आहे. त्याने फार्सी ग्रंथात या भाषेचे ही वाक्ये 'अरे मौलाना एव डा होसी' आणि 'जो मुडासा बंदइ सो पाई पसरइ' दिलेली आहेत. असल्या किरकोळ उल्लेखांखेरीज या भाषेत या भाषेच्या मायघरी काहीच साहित्य औरंगजेबमृत्युकालापर्यंत निर्माण झालेले नाही. सर्व निर्मिती महाराष्ट्र वा त्याच्या परिसरात झालेली आहे.

दिल्लीच्या मुसलमानी सत्तेची स्थापना दक्षिणापथात प्रथम शक १२४० ला झाली. वीजापूर येथे पहिली लाकडी मशीद बांधणाऱ्या रेवय्या सुताराला भूमिदान केल्याचे मराठी भाषेतील शासनपत्र शक १२४२ त शिलालेखबद्ध झाले. शक १२४७ मध्ये महाराष्ट्रात खानापूर येथे मशीद बांधण्यात आली व त्याचा फार्मी लेख शिलेवर कोरला गेला. तसेच राजूर, तालुका मलकापूर, बुलढाणा येथे शक १२४१ मध्ये मशीद बांधण्यात आली. पुढील शेपाऊणशे वर्षात सर्व महाराष्ट्रभर व आसमन्तातील कानडी-आंध्रप्रदेशावर मुसलमांनी सत्ता स्थापन व सुस्थिर झाली.

दक्षिणेत आलेल्या या विजेत्या मुसलमानांपैकी काहींची मातृभाषा फार्सी होती. ती कागदपत्रांची राजभाषाही होती. परंतु या भारतीय असलेल्या सर्वच मुसलमानांना फार्सी भाषा येत नव्हती. हे मुसलमान हिंदी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रदेशातील व विशेषत: दिल्ली, मेरठ, बिजनौरच्या प्रदेशातील होते. त्यांची मातृभाषा खडीबोली होती. हे सर्व आपसात खडीबोलीच बोलत. शिवाय हे मुसलमान हिंदीतर दाक्षिणात्यांशी याच भाषेत बोलत. सैन्य व राजकारभारात बोलभाषेसाठी या खडीबोलीचा उपयोग होई. दक्षिणेतील सूफी साधु याच बोलीचा वापर करीत स्व. डॉ. ईरच तारापोरवाला यांनी या भाषेचे स्वरूप आंतर प्रांतीय भाषा अर्थात राष्ट्रभाषा असे निर्णीत केलेले आहे. फ्रेंच विद्वान गार्सा द तासी याने या भाषेला भारताची राष्ट्रीय भाषा म्हटले आहे. या भाषेत हिंदूंनी लिहिले नाही. शकाच्या सतराव्या शतकाच्या मध्यापर्यन्त या भाषेत कोणाही हिंदूने रचना केली नाही. जयराम पंडिताने या भाषेला दाक्षिणात्य यावनी असे नाव दिले होते असो. मुसलमान जे त्यांना. फक्त अरबी–फार्सी लिपी येत होती. आरंभीच्या सूफींनी जेव्हा या भाषेला लेखनद्वारा व्यक्त केले तेव्हा त्यांनी या फार्सी लिपीचाच उपयोग केला. या भाषेचे प्रथमच साहित्य निर्मिणारा म्हणून अमीर खुस्रौचे नाव येते आपण हिंदीत काव्य लिहिल्याचा उल्लेख स्वत: खुस्रौनेच केलेला आहे. अमीर खुस्रौने लिहिलेल्या काही प्रहेलिका अर्थात् पहेली वा उखाणी उपलब्ध आहेत. त्याने फार्सी भाषेतही पहेल्या लिहिल्या आहेत. रीख्ता किंवा करम्भकशैली वापरणारा तो खडीबोलीतील प्रथम लेखक होय. त्याने फार्सी व अरबी मिसळून रीख्ता शैलीत कविता लिहिल्या आहेत. दक्षिणेत खडीबोलीत साहित्यरचना करणारा ख्वाजा बन्देनवाज हा साधु होय. तो ८० व्या वर्षी (शक १३२१ मध्ये) देवगिरीस आला. तेथे ३-४ वर्षे राहून तो फेरोजशहा बहामनीच्या बोलावण्यावरून गुलबर्ग्यास गेला. आपल्या मृत्यूपर्यंत (शक १३४४) तो तेथेच राहिला. त्याने तीन चार छोटे छोटे गद्य–ग्रंथ लिहिलेले आहेत. त्यात सूफीमार्गाचा उपदेश केलेला आहे.

कुतुबशतक नावाचे खडीबोली व नागरी लिपीत लिहिलेले गद्यपद्य पुस्तक अलीकडे उपलब्ध व प्रकाशित आहे. त्याचा लेखक मुसलमान असून लेखनकाल, अंतर्गत पुराव्यावरून शक १३५०-१४०० असा दिसून येतो. फार्सी लिपीत आढळणाऱ्या भाषेपेक्षा या ग्रंथाची भाषा जुनी व वैशिष्टययुक्त आहे. हाच खडीबोली अथवा दक्खिनी हिंदीचा प्रथम ग्रंथ मानावा लागेल. आजपर्यंत हा मान निजामी नामक बहामनीकालीन कवीला मिळत होता. त्याचे एक कथाकाव्य–मस्नवी कदमराव हौर पदम नावाचे उपलब्ध, पण अप्रकाशित आहे. निजामी शक १३८२ ते १३८४ या वर्षात जीवित होता. त्यातील दोन बैत (द्विपंक्ति) असे.

शहनशह बडा शाह अहमद कुंवर
पिरतपाल संसार करतार अधार ।
अधींस ताज का कौन राजा भुजंग
कुंवर शाह का शाह अहमद भुजंग ।

महमूद बहामनी (राज्यकाल शक १४०४ ते १४४२) या राजाच्या काळात कुरेशी नामक कवीने कोकशास्त्रावर भोगफ़ल नावाचे एक काव्य–मस्नवी लिहिलेले आहे. या कवीने या भाषेला हिंदुई व दखनी अशी दोन्ही नावे वापरलेली आहेत.

वरिद शाह महमूद के दौर मी
किए हिंदुई को कवन फारसी ।
सो इस शाह के दौर बीदर मुकाम
यो शाइर किया नज्म् दखनी तमाम ।

नव-सर-हार या कथाकाव्याच्या (मस्नवी) लेखक जालनानिवासी शाह अश्‍रफने (शक १४२६) या भाषेला हिंदूईच म्हटले आहे. त्याने काव्याचा लेखनकालही दिलेला आहे.

नजम लिखी सब मोजूं आन
यूं सब हिंदुई कर आसान ।
नौ सौं होवे अगले नौ
यो दुख लिख्या अश्‍रफ तू ।

शकाच्या पंधराव्या शतकाचा प्रथमार्ध उलटून जाईपर्यन्त या भाषेत मराठीचा विशेष प्रभाव दिसून येत नाही. वरील सर्व ग्रंथ अजून अप्रकाशित आहेत. हे कवीही गुलबर्गा व बीदर येथील आहेत. परंतु या पुढील काळातील एक विजापुरकर कवी शाह मिरांजी (मृत्यु शक १४८५) याच्या भाषेत मराठी प्रभाव भरपूर आहे. याने आपल्या भाषेला हिंदी असे नाव दिले आहे. त्याच्या भाषेत भक्तिमार्गाची परिभाषा वापरलेली आढळते.

यों गुरुमुक पद पाया — तो ऐसे बोल निपाया ।
जे कुई अच्छे खासे — इस बयान केरे प्यासे ।
वे अरबी बोल न जाने — ना फारसी पछाने ।
यो उन कूं बच्चन हेत — सन्त बुझे रीत ।
यो देकत हिंदी बोल — पन मानी हैं निपतोल ।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कडवे पन सूरस फल पाके जूं फनस ।
त्यूं इस में अरत नीच सब कुरान केरे बीज ।

या खेरीज आरम्भीच्या मराठी कवीप्रमाणेच, मीरांजीने फार्सीच्या सन्दर्भात हिंदी भाषेची वकिली केलेली आहे. तो म्हणतो–

है कडवा केरा हीरा घुड ऊपर पडिया नीरा ।
कुई सुजान भगवान पावें तो क्यूं ना लेह उचावे ।

हाच आशय मुकुंदराज, ज्ञानेश्वर, फादर स्टिफिन्स आदि कवींनी व्यक्त केलेला आहे. या मीरांजीने ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईच्या अनुकरणपर खुशनूद या विरागी, भक्त, संयमी, निष्काम अशा तरुणीचे चित्र रेखाटलेले आहे. मुक्ताबाईप्रमाणेच या खुशनूदने लग्न केले नाही, मुक्ताबाईप्रमाणेच ती अठराव्या वर्षी दिवंगत झाली. ज्ञानेश्वराच्या समाधि–सोहळयासारखाच सोहळा खुशनूद मेल्यानंतर झाला असे त्याने वर्णिले आहे.

शकाचे सोळावे शतक (हिजरीचे अकरावे) दक्खिनी हिंदीच्या परमोत्कर्षाचा काल होय. हा उत्कर्ष विजापूर आणि गोवलकुंडा या दोन्ही राजधान्यात घडून आला. दोन्ही राजवंश इराणातून आलेले तुर्की मुसलमान होते. इराणातून भारतात येणाऱ्या फार्सीभाषी विद्वानांना दिल्लीत भरपूर राजाश्रय मिळत असल्यामुळे असे विद्वान या राज्यांत कमीच येत. फार्सी राजभाषा असली तरी बहुसंख्य मुसलमानांना सोप्या व सोईस्कर अशा खडीबोलीला या दोन्ही ठिकाणी राजाश्रय मिळाला. गोवलकुण्डयात कुली कुतुबशाह, मुहम्मद व अब्दुल्ला कुतुबशाह हे राजे स्वतः या भाषेचे कवी होते. तसेच विजापुरात द्वितीय इब्राहिम व द्वितीयअली आदिलशाह हेही कवी होते. यापैकी चार राजांचे काव्यसंग्रह आता उर्दूत प्रकाशित झाले आहेत. या दोन्ही दक्षिणी राज्यांना दोमशे वर्षांचा शांततेचा काळ लाभला. या काळात दोन्ही राज्यात अनेकानेक लहानमोठे कवी निर्माण झाले. त्यांनी नि-सत्व अशा या खडीबोलीला संपन्न व आविष्कारक्षम अशा प्रौढ साहित्यिक भाषेचे विलोभनीय स्थान प्राप्त करून दिले. या कवी प्रभावळीतून फक्त काहींचाच ओझरता उल्लेख येथे शक्य आहे. नुस्रती (मृत्यु शक १५९६) वजही (जीवित शक १५५८), हसन शौकी (जीवित शक १५५६) आणि गवासी (जीवित शक १५६२) हे खरोखरच दक्खिनीचे कविशिरोमणि होत. नुस्रती हा सर्वश्रेष्ठ आहे. नुस्रती व गवासी हे राजकवी होते. पहिला द्वितीय अली आदिलशाहाच्या दरबारात, तर शेवटचा अब्दुल्ला कुतुबशाह याच्या दरबारात मलिकुश्शुअरा–कविराज होते. नुस्रतीचे महाकाव्य–अलीनामा, अलीच्या कारकीर्दीतील १०–१२ वर्षांचा इतिहास असून. त्यात मुख्यतः औरंगजेबाचा सेनापती राजा जयसिंग याच्या, शिवाजीच्या सहाय्याने केलेल्या, विजापुरावरील स्वारीचे वर्णन आहे. गुलशन-इश्क हे त्याचे मधुमालतीच्या लोककथेवर आधारलेले असे अप्रतिम प्रेमाख्यानक काव्य आहे. दोन्ही ग्रंथ आजपर्यंतच्या उर्दू काव्यातही अपूर्व आहेत, अलीनामा वीररसप्रधान असून तसा ग्रंथ दक्खिनी वा उर्दू साहित्यात नाही असा स्वर्गीय डॉ. अब्दुल हक यांचा अभिप्राय आहे. परंतु या कवीत तत्सम व तद्भव शब्दांचा विशेष वापर असल्याने उर्दू पंडित वलीला महत्व देतात. हा वलीच्या ३५ वर्षे अगोदर वारला. हसन शौकीनें तालीकोटच्या युद्धावर शक १५४८ च्या सुमारास ऐतिहासिक काव्य–फतहनामए–निजामशाह मस्नवी, लिहिले त्याचे दुसरे काव्य मेजबानीनामा आहे. दोन्ही ग्रंथ पाकिस्तानात व अप्रकाशित आहेत. वजहीचा अतिशय प्रसिद्ध असा सबरस नावाचा गद्यग्रंथ आहे. तो बाणभट्टाच्या कादम्बरीच्या धर्तीवर प्रासमय अशा गद्यात लिहिलेला आहे. वजहीचे कुतुबमुश्तरी नावाचे हजार एकराशे भुजंगप्रयात श्लोकांचे प्रेमकाव्यही काव्यदृष्ट्या चांगले आहे. मुल्ला गवासी याने फार्सी ग्रंथावरून, संस्कृत शुकसप्तति ग्रंथाचा दोन अडीच हजार भुजंगप्रयात श्लोकात, अनुवाद केलेला आहे. त्याचे सैफुल्मुल्क नावाचे एक प्रेमकाव्यही प्रकाशित आहे. गवासी यांच्या गजलांचा संग्रहही प्रकाशित आहे. अलीकडे मैना सतवंती नावाचे त्याचे कथाकाव्य प्रसिद्ध झालेले आहे.

भाषिक वैशिष्ट्य

दक्खिनी हिंदीत सर्व लिंगात नामाचे अनेक वचन आन, आं प्रत्यय लागून होते, उदाहरणार्थ मोहिन्यां, सहील्यां, सर्वां, होंटां, लडां झाडांके पेडां मने भरत्यां इत्यादि. इ. ईकारान्त स्त्रिलिंगी नामात वैकल्पिक रूप मोहिनियां, सहीलियां असेही बनते. मराठीतील नामद्विरुक्ति घरोघर, बनोबन इत्यादि रूपाच्या ऐवजी या भाषेत तृतियेचा इ–ई, ए-एं प्रत्यय लागून, बनेबन,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जंगले जंगल, घरें घर इत्यादि रूपे बनतात. संस्कृतात विशेष्याची विभक्ती विशेषणास मिळते. या प्रथेवरून जुन्या मराठीतल्याप्रमाणेच दक्खिनी हिंदीतही सामान्य-रूपाच्या अनेकवचनात विशेषण व प्रत्ययांचेही अनेक होते; जसे

'मोटा नहीं बांदते रंग क्यां'
कि बातां यों सुन कर मेरी ग्यान क्यां
रह्यां थक हो कमन्यां खुरासान क्यां।

बाजे औरतां मर्दां खातिर सत्यां हुयां हैं, आग में जल्यां हैं. (सबरस पा. २२०).

कर्ता–कारक 'ने' प्रत्यय मराठीत तृतियेचा समजण्यात येतो. हिंदी व्याकरणात ती प्रथमा मानण्यात येते. जुन्या कुतुबशतक काव्यात 'ने' नाही. इ–ईं, ए–एं, ही–हीं, हूं–हूं या प्रत्ययाच्या रूपानेच ने चे कार्य करवून घेतले जाते परंतु दक्खिनीत 'ने' प्रत्यय वापरला जातो. त्याच्या वापरात अनियमितता दिसून येते. हा 'ने' मराठीच्या साहचर्याने दक्खिनीत गेलेला आहे. प्रथमा विभक्तीत उ, ऊ प्रत्ययाचा वापर क्वचित ठिकाणी दिसून येतो. द्वितीया विभक्तीतीत कूं, कों प्रत्ययाचा उपयोग होतो. तृतीया व पंचमीसाठी सं, सूं, सों, ते-तें, थे-थें, सिते, सीते, सात इ–ई, ही–हीं, हूं, ऊं इत्यादि प्रयुक्त होतात. चतुर्थीस खातिर, बदल यांचा वापर होतो. सम्बन्धवाचकासाठी का, की, के यांच्या खेरीज केरा, केरी केरे हे प्रत्यय प्रयुक्त होतात. जुन्या साहित्यात षष्ठीसाठी ह आणि न याचा वापर आढळतो. हम, तुमन, आपन ही तीच शेष रूपें होत.

संस्कृतमधील भूतकालिक साधितापासून भूतकाल-वाचक क्रियापद बनते–जसे जान्या बोल्या, भाग्या, धऱ्या यांची कवितेत वैकल्पिक रूपे जानिया, बोलिया, भागिया, धरिया अशीही आढळतात. भविष्यकालिकात गा, गी, गे याच्या जोडीने सी-कारान्त रूपेही आढळतात—जसे जासूं, लेसूं, रहसी, जासी, जिरवसी वगैरे.

जधां, तधां, कधां, जधन, तधन, कधन, कधीं, संग, सात, संगात, नमन, नमून, नमने, घात, जिन्स, नाद, सम, समान ही अव्यये प्रयुक्त होतात. उभयान्वयी अव्यय जो, जे शक सोळाशे, साडे सोळाशे म्हणजे अन्य भाषांच्या तुलनेने दीर्घायु आहेत. मराठीत लौकर गतायु झाले याच्याच जोडीला, मराठीप्रमाणेच कि, की पण प्रयुक्त होते. (या कि, की प्रत्ययाबद्दल माझा म. सा. पत्रिका क्रमांक १६३ मधील लेख पहावा)

हजारां शुक्र है जो आज दिन पंजतन के सदके
हर यक मोमिन के मन के म्याने सो बसता सूर दिसता है (कुली, शक १५३३)

खालील कडव्यात कि आणि जो दोन्ही प्रयुक्त आहे.

विहतर जो यो तन की थाट तुट जाए
जानो कि मिट्टी के माट फुट जाए (बहरी, शक १६२२)

दक्खिनीची भारतीयता

आजचे उर्दू साहित्य अभारतीय आणि अराष्ट्रीय आहे असा विद्वानांचा त्यावर आरोप आहे. पण उर्दूच्या पूर्ववर्ती दक्खिनी हिंदी अर्थात् दकनी उर्दूबद्दल तसे म्हणता येत नाही. त्याची कारणे खालीलप्रमाणे होत.

१) अन्य सर्व नव्य आर्य भारतीय भाषांप्रमाणेच या भाषेचे शब्दभांडार तत्सम व तद्भव शब्दांचे आहे. देश्य शब्दांचा वापर इतरांप्रमाणेच आहे. या भाषेत अरबी–फार्सी शब्द आहेत. त्यांचे प्रमाण आरम्भी फारच कमी होते. तिच्या वैभवकाळात ते १५ ते २० टक्के होते. उत्तरोत्तर ते वाढत गेले. पण यामुळे तिच्या स्वरूपात विशेष फरक पडला नाही.

२) तिचे भाषिक व व्याकरणात्मक स्वरूप केवळ भारतीय आहे. वरती दिलेल्या भाषिक आराखड्या-वरून हे दिसून येते.

३) परकीय शब्द स्वीकारताना अन्य भाषा भगिनींनी चोखाळलेल्या मार्गानेच ही भाषा पुढे गेली. प्राकृतीकरण, तद्भवीकरण अथवा सारूप्यीकरण हा आजच्या आर्य भारतीय भाषांचा स्वभाव आहे. हीच संस्कारप्रक्रिया दक्खिनीने अरबी–फार्सी शब्दांच्या बाबतीत वापरलेली आहे. अरबी (ताजीचा) तेजी. (नफअ) नफा, (मुलाहिजह) मुलाजा, (खारिज) खेरीज, (बदल) बदल, (फह्म) फाम, बेफाम, (मुशाइरा) मुशारा, (वजअ) वजा, (सर्व) सरू (झाड) ही सारूप्यीकृत रूपेच सर्वत्र वापरलेली दिसून येतात.

४) दक्खिनीचा साहित्यिक आत्मा भारतीय आहे. फार्सी काव्यात प्रेयसी पुरुष असते. दक्खिनी हिंदीत ती युवती, नार, धन, धनी, धनिकाच आहे. तिने वापरलेले काव्यसंकेत बहुधा भारतीय आहेत. अलक, अधर, दंत, कदली, चंद्र, भंवर इत्यादि उपमाने भारतीय आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारतीय साहित्यातील अप्सरा, सीतेचा कांचनमृग, गोपिका वस्त्रहरण, संन्यासी, ऋषीच्या आशीर्वादाने निपुत्रिकास पुत्रप्राप्ति, स्त्रीचे पातिव्रत्य, कुलटानिंदा, आश्रमाचे पावित्र्य, अर्थो हि कन्या परकीय एव ही भावना, जरासंधाचे जरासंधत्व, भीमाची गदा इत्यादि साहित्यसंकेत मुक्तहस्ताने वापरलेले आढळतात.

५) अ) अमीर खुस्रौपासून भारतीय साहित्यिक-परम्परांचे अनुकरण या भाषेत झालेले आहे. संस्कृत आख्यायिकेचे भामहविश्वनाथादींनी सांगितलेले व बाणभट्टादीनी वापरलेले तंत्र दक्खिनी हिंदीत अवयाते-सिलसिला या रूपाने अवतरलेले आहे. (आ) एकचरण संस्कृत व एक प्राकृत, अपभ्रंश वा अन्य लोकबोलीत अशा श्लोकांच्या करम्भक शैलीचा वापर दक्खिनीतही झालेला आहे. याच शैलीस रीख्ता असे म्हणण्यात येते. (इ) पहेली, उखाणे लिहिण्याची पद्धत या भाषेतही रूढ आहे. (ई) मराठीची स्त्रियांच्या ओव्या म्हणण्याची पद्धत मुसलमान स्त्रियात रूढ आहे व होती. शिव-कालीन कवि हाशमी याच्या गजलात याचा सुगावा मिळतो.

मुझे गाने कूं आता है क्यूं आ गावूं ओई पडोसन पर
बिबी हो कर नरत का बी लेती है तान बोलेगी।

(उ) प्राकृत-अपभ्रंशादि भाषांची व्याकरणे, कोश इत्यादि संस्कृत भाषेत लिहिण्याची प्राचीन परम्परा भारतीय भाषात चालू आहे. वररुचि, हेमचन्द्र, उक्ति-व्यक्तिप्रकरण रचणारा दामोदर पंडित ज्ञात आहेत. याच धर्तीवर अमीर खुस्रौने खडीबोलीचा शब्दकोश फार्सी भाषेत लिहिला. तो खालिक बारी होय. असे ४१५ कोश नंतरच्या काळातही लिहिले गेले. त्यापैकीच हिंदी कवींची चरित्रे फार्सी भाषेत लिहिण्याची पद्धतही होय. अशी दहाबारा कविचरित्रे (तार्ज्करएशुअस) शक १६७५ च्या पुढील काळात लिहिलेली आहेत. त्यात एकूण दीड हजार कवींचा उल्लेख सापडतो.

मराठीचा प्रभाव

दकनी उर्दू म्हणजेच दक्खिनी हिन्दी ही मुसलमानी संपर्काने निर्माण झालेली नवीन भाषा आहे असा गैर-समज मुसलमान विद्वानांनी आपले श्रेष्ठत्व व भिन्नत्व दाखविण्यासाठी गेल्या शतकात पसरवून दिलेला होता. एतद्देशीय व परदेशीय आंग्लभाषी विद्वानसुद्धा या अपसमजाला बळी पडलेले आहेत. स्व. डॉ. ईरच तारापोरवाला यांच्यासारखे भाषाशास्त्रीसुद्धा यातून सुटू शकलेले नाहीत. आता हे सत्य विद्वन्मान्य झाले आहे की, दिल्लीच्या आसमंतातील खडीबोली या बोल-भाषेचे वरील भाषा हे साहित्यिक रूप होय. ज्याप्रमाणे प्राणिशास्त्रातील नियमानुसार गव्हाच्या बीजापासूनच गहू निर्माण होतो त्याप्रमाणे बोलभाषेपासूनच साहि-त्यिक भाषा बनू शकते. असो. मराठी आणि खडीबोली किंवा दक्खिनी हिंदी या एकाच कुलातील सख्ख्या बहिणी होत. त्यांच्यात सर्व प्रकारचे प्राकृतिक साम्य आहे. दक्षिणेतील दक्खिनी हिंदीचा विकास म्हणजे तिचे अज्ञातवासातील जीवन होय. तिच्या प्रपंचात कानडी व तेलगू भाषांचे विशेष सहकार्य होऊ शकले नाही. हे साहाजिक व अपेक्षित असेच आहे. मराठी भाषेच्या या सहकार्यात अनेक अंगोपांगांचा समावेश होतो. (अ) पहिली गोष्ट म्हणजे अनेक केवळ मराठी शब्द या दक्खिनीत, दुधात दूध मिसळावे त्याप्रमाणे मिसळून गेले आहेत. मराठी शब्द याचा माझा अभि-प्राय सर्व तद्भव शब्दाचा नाही. एकाच संस्कृत मूळ शब्दापासून निरनिराळ्या भारतीय भाषात निरनि-राळी रूपे होतात. येथे मराठीच्या प्रकृतीला अनुसरून बनलेले तद्भव व देशी शब्दच अभिप्रेत आहेत. अशा मराठी शब्दांची संख्या दक्खिनी हिंदीत शेकडोंनी आहे. (आ) शब्दांच्या बरोबरीनेच अनेक मराठी वाक्प्रचार या भाषेत प्रयुक्त झालेले दिसून येतात. शब्दांप्रमाणेच हे वाक्प्रचारदेखील केवळ मराठी आहेत असे दिसून येते. (इ) काही मराठी म्हणींचाही वापर या भाषेत केलेला आढळून येतो. ही मराठीच्या प्रभावाची ढोबळ रूपे होत. (ई) मराठी माणसांच्या बोलण्याच्या व वागण्याच्या काही ढबी दक्खिनी साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या आहेत. ही बोलण्याची ढब मराठीच आहे असे मराठी माणसाला सहज ओळखता येते. (उ) याशिवाय मराठीच्या काही व्याकरण-वशेषांनी या भाषेत व पर्यायाने राष्ट्रभाषेत कायमचे वास्तव्य केलेले आहे. त्यात तृतियेचा भूतकालिक कर्ता-कारक ने हा प्रत्यय अत्यंत महत्वाचा आहे. (ऊ) काही केवळ मराठी काव्यप्रकारचा वापर या भाषेने केलेला दिसून येतो. यात मराठी ओवी आणि लावणी ही दोन्ही या भाषेत प्रचलित होती, याच्या खुणा काही साहित्यिकात उप-लब्ध आहेत.

शब्दभाण्डार

दक्खिनीतील निरनिराळ्या साहित्यिकांनी इतके केवळ मराठी शब्द वापरलेले आहेत की त्यांची नोंद

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घेणे कठीण आहे. शब्दांच्या या उसनवारीत दोन गोष्टी प्रामुख्याने डोळ्यासमोर येतात. (१) ही शब्द-संपत्ति. मराठीच्या विकास अवस्थेकडे वा इतिहास-क्रमाकडे पाहिल्यास, सापेक्षतया जुन्या काळातील आढळून येते (२) दुसरी गोष्ट म्हणजे अनेक शब्द केवळ ग्रामीण जीवनातील आहेत. हे शब्द आजकालच्या नागरी जीवनातच रंगलेल्या व ग्रामीण जीवनाचा जवळचा अनुभव नसलेल्या आजच्या मराठी साहित्यिकांलादेखील अनपेक्षित असे भासतात. मुल्ला नुसती याच्या अलीनामा या ग्रंथातीलच काही शब्द नमुन्या-दाखलच पाहू. अचपल (अत्यंत चपळ), अचूक (विनचूक), अटाअट, अंतर पडणे (ताटातूट होणे), अनी (टोक). अंबील (पेय), अवसान (धैर्य), अवाई (अफवा), अवा का सवा (अवाच्या सवा), आड (आडोसा), आड आना (आड येणे) आवले जावले, उतराई, उपटना (जोरात पळणे) उफाळना, उरना, उलेंडना (उलंडणे), एखादा कच (खच, प्रेतांचा ढीग), कडा [डोंगराचा], कती [विशिष्ट विळा], कधी करडी [दृष्टि]. करनी [पराक्रम], कलना [तोल जाणे], कळप, कलवंडा [काळवंडा] कसवटी, का कू करना, काड [गव्हाचे काड], कावाला [कव्हाळे फल] कुंची [विस्त्र-विशेष], कुनमट, कुरन, कुसल, कोता [अल्प], कोयता [विळा], खंगना [खंगणे], खन [इमल्याचा खण], खनौरा [दरवेडकर], खपर [खापर] खलखल ध्वनिविशेष], खूंटना [खुंटणे], खोड लाकूड, सवय], गंगावन [स्त्रीकेश], गरदाड, गरबगेल [गर्भगाळीत], गल [मासे धरण्याचा], गिरान [ग्रहण], गुडगा [गेचवा, गेरू, गोदडी, घड [फलसमूह], घण [लोहाराचा], घुळी [वळू], घेंगावना [घागावणे–विचलित होणे], च [अव्यय], चगलना [चघळणे चड [श्रेष्ठ], चपाती, चाड [इच्छा], चाम [कृमिविशेष], चाव [त्वेष], चिपारी [चीप] चिमटी [चिमूट, चीरा, चुचकारना, चुंबल, चूडा [कंकणविशेष], चोक [चोख] छपर [छप्पर], छाती, जगरा [जगरे] जळता विस्तव], जनमजुग [आयुष्यभर], जपना [१रक्षण करणे, २जप करणे], जिवालना [जिव्हाळणे], जीव आटना [जीव आटणे], जीव बारा होना, जीव वंचाना [जीव वाचविणे] झाडी, झांप, झांपना [झांपणे], झूल [बैलांची], झेलना, झोडना, झोडाझोड झोमाझोम [झोंबाझोंबी], टलना [टळणे], ठान [तवेला], ठेका [गतिविशेष] डगमगना, डलमलना, डुलना, डोह [खोल पाण्याचा डोह], ढलना [ढळणे] ढेप, तडकना, तडका-फडक, तडफडना, तानना [पळवून दमविणे], तात्र [त्वेष], तुतारी, तुम [तुंब पाण्याचा], तोड [युक्ति], थक होना [थक्क होणे] थमना [थांबणे, थर, थल [थळ, उसाचा मळा], छवा, थांग, थाट, थीर दंडलाना]दंडविणे], दहीहंडी, दाटन, दाड [जबडा], दांडगा, दावन बैल बांधण्याचे स्थान], घड [१शरीर, २सुरक्षित], घंड [शरीर], धाड [हल्ला] धामिन [धामीण], धिंगांना नकटी, नको, नांदना, निकामी, निबर, निवाडा [निवाडा], निभावना [निभविणे, नव्हे [नोहे], पजर [पाझर], पटाईत पडझड, पडाव [पाडाव] पंदा [गवत-विशेष], परतना [परतणे], पवना [गवतविशेष], पाखर [खोगीर], पाड [तुलना], पांव मार पानी निकलना [लाथ मारून पाणी काढणे], पाल [तळ्याची भिन्त]' पेटसूं [पोटीशी, गरोदर] पेरना, पेरा [पेरे–उसाचा तुकडा], पोकल, पोत [मशाल]. फली [रांग] फुनगी, फुटाना, फेर, फोल [फोलकट], बनवी [वणवी, वणीम], बरे बावा [वाडा, घर], वा रे उद्‌गारवाचक], विचकना, विदगी [छोटी घागर] विल [बीळ], विलगना, विसरना, वुका [बुक्का], वुचडा, वुला भेंजना [बोलावू पाठवणे], बेगी [भेगी], भडकल [महाद्वार], भता [भाते], भांडवल, भांडा [ताप] भिडना [भिडणे] भुंयार, भोक [छिद्र], भोग देना [संभोग देणे], मिरवना, मोकला, मोट [गाठोडे, यंत्र]. मोड [अंकुर], मोली [मोळी], रगडना, रहवासी, राजवट राजविंडा, रूसना, रेलचेल, न्हेंटना [रेटणें], लई [पुष्कळ], लग्यालग [लगोलग], लव्हाला, लांडगा, वल [वळ], वलवलणे [वळवळणे], वायला [वेगळा], वैताग, सई [सै, स्मृति], संजगरी [सजगुरा], संवालना [संभाळणे], सरना [संपणे], सलना [सळणे], सौरात, सितरघात [सितरणे], सेकना सेवया, हंकाट [हाकाटी], हटकना, हतखंडा, हदरना, हाकना, हिंडणे, हिंदोला हुकना, हुंकार, हुडहुडना, हुलकाना [हुलकावणे.

आता काही विशिष्ट मराठी शब्दांचा उल्लेख थोडा तपशिलाने करू. या शब्दांचे वैशिष्टच असे की, त्यांचा शुद्ध पाठ व अर्थ उर्दू विद्वानांना लागलेला नाही. उदाहरणार्थ गरती हा शब्द वजही, गवासी आणि हाशमी या साहित्यिकांनी या शब्दाचा वापर अनेक वेळा केलेला आहे. संपादक सर्वच डॉक्टरेट पदवीधारक आहेत. पण एका ठिकाणीही शुद्ध पाठ व अर्थ सापडत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गवासीने हा शब्द असा वापरलेला आहे.

कहां थे सुन्या दिल की वातां कूं मैं
यों दिल गरती मुंज पर सो इत ना हुवा ।
वो फित्ले भऱ्या सो है फित्ना अजब
इसी थे इता जग में फित्ना हुवा ।

अन्य कवींची उदाहरणे अनावश्यक होत. अलीनामा ग्रंथात शिवाजीचे वर्णन करताना नुस्रती म्हणतो.

सिवा खेल उस सात करने मंग्या
उस स्याने कूं फन सूं सितरने मंग्या ।
मिलाया मुखंड चोर खूं-खार कं
अपस सारके रिंद व अय्यार कं ।
लिया कर अंगे कुनभटां फन के जोर
खनौरे दरवडेकर औवाश चोर ।

येथे सितरना, मुखंड, कुनभट, खनौरे, व दरवडेकर हे शब्द लक्ष्य होत. ज्ञानेश्वरांनी वापरलेलाच सितरणे हा शब्द होय. कुनभट शब्दाचा पाठ व अर्थ मी अनेक विद्वानांशी चर्चिला आहे. खनौरे शब्द शिशुपालवधाच्या खालील ओवीत आलेला आहे.

कि कामतत्वाची मारदोरी : वांधतां पांचाखरी
ना तो उघडा खानौरी : अनंगाचा । २६३

खनौरा, खानौरी याचे वैशिष्टय असे की तो खनती लावून द्रव्यावर दरवडा घालतो. कवीन्द्र परमानन्दाने शिवाजीला खनकच म्हटलेले आहे. दरवडेकर शब्दात त्याची भारतीय परम्परा आहे. हा दरोडेखोर नव्हे. तुकारामाच्या खालील चरणात खाणोरी म्हणजे खादाड नव्हे. वरील अर्थच तेथेहि आहे.

भरी लोकांची पांटोरी । मेला चोरटा खाणोरी ।
५६८

कुनभट शब्दाचा तिरस्कारार्थी वापरच आज देखील चालू आहे. नुस्रतीने याच अर्थाने तो वापरला आहे.

ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील पसाय शब्द नुस्रतीने खालीलप्रमाणे वापरला आहे. पसाय हे प्रसाद शब्दाचे तद्‌भवरूप.

शिताबी सूं अं-पडे सो खूबी पछान
दिए घन पसाए कूं घन का निशान ।

लांग, लांगाड हा शब्द आपल्या परिचयाचा नसेल. तो हाशमींच्या खालील गजल-चरणात आढळतो.

दिल की तू कहने कूं मिरे काटे तो क्या है लाग
बहुत
यों इश्क तुझ होएगा आदिक ज्यूं पीक होवे
लाग का .

खरीप ज्वारीचे मुख्य पीक कापल्यानंतर पुन: फुटणाऱ्या फुटीला लांग म्हणतात.

खालील दोन चरणात शाह तुराब या कवीने नाम (गंवरेखा) शब्दाचा वापर केलेला आहे. दोन संपादकांना त्याचा अर्थ कळलेला नाही.

चुपी देव पूजन कूं देवल में जाते
चुपी नाम आडा खडा क्यों लगाते । ४५
लगा कर खडा नाम सीदा दुवारी
कलाते हैं कयते हैं वरहमन अचारी । १११

यात्र तुराबने उताणा, उताणे राज्य याचा उपयोग केलेला आहे.

यो वस्ती सो दुनिया पो मत हो उताना
अरे मन नको रे नको हो दिवाना । ३५
अरे मन तेरी देख कर तूं जवानी
नको चल अवस कर तुं छाती उतानी । ५७

या तुराबने समर्थ रामदासांच्या मनाच्या श्लोकांचा समवृत, पण स्वैर अनुवाद केलेला आहे. नुस्रतीने आपल्या अलीनामा महाकाव्यात पेटसूं (पोटीशीं-गरोदर) आणि आवळेजावळे शब्दांचा उपयोग केलेला आहे. पोटीशी शब्द केवळ मराठी मातीतून जन्मलेला आहे

अन्य भारतीय भाषात तो दिसत नाही. मुसलमानांनी केवळ त्याचे भाषांतर केले.

नुस्रती म्हणतो—

कहे तूं कि हुई है जमीं पेटसूं
बचा दल का सटने चली नेट सूं । ३९-३७
घडी यक उसे देखने लग वले
वचे दो जनी आवले जावले । ३९-३८

वाक्प्रचार

मराठीतील अनेक वाक्प्रचार थोडयाशा रूपांतराने दक्खिनी हिंदीत प्रयुक्त झालेले आहेत. फार्सी म्हणजेच नवीन नाव धारण केलेली ईराणी भाषा. हीही आर्यभाषा होय. फार्सीतून देखील समानार्थी वाक्प्रचार मराठीत आलेले आहे. सर्व वाक्प्रचारांचा उल्लेख दुरापास्त आहे. वजही याच्या कुतुबमुश्तरी या छोटयाशां काव्यातील काही वाक्प्रचार येथे दिले आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आंख मारना [डोळा मारणे], अंत देना–लेना [अंत देणे, घेणे], अवछिट होना [अवचिट होणे], कड लेना [कडेवर घेणे], कान भरना [कान भरणे], गरब गल पडना [गर्भ गळून पडणे], खेल मांडना, चटका लगाना [चटका लावणे], चाले करना [चाळे करणे], दातों में काडी घरना [दातीं तृण धरणे], पेटसूं होना [पोटीशी होणे–गरोदर होणे], सुतरघात करना [केसाने गळा कापणे] हात पकडना [हाती धरणे] इत्यादि.

गवासी कवीने तोतीनामा काव्यात खालील वाक्प्रचार वापरलेले आहेत. ढलढल रोना, खोल कहना [उघडून सांगणे], पीट लगना [पाठी लागणे], कमर बैसना [कंबर बसणे], आवता जाऊंगा [येत जाईन] कौटयाल करना [कौटाल करणे], तप घालना [तप घालणे], बारा बाट होना [बारा वाटा जाणे] जिवें, जिवां मारना [जिवें मारणे], घतूरा देना नेट करना छाती होना इत्यादि.

संबोधन प्रकार

संबोधन प्रकारात गे हा केवळ मराठी शब्द आहे. याचा वापर हिंदी वा उर्दूत झालेला आढळत नाही. परंतु दक्खिनीत तो वापरलेला दिसून येतो. कुतुबमुश्तरी काव्यात [वजही]

थोडा बहुत जानी है भी जान गे
मेरी बात तूं साच कर जान गे । १५३०

त्याचप्रमाणे हो हा शब्दही केवळ मराठी आहे.

कता हूं सुनो कान घर लोक हो ।
कहावत मने बात जो आइ हो । ३३८

नुस्रती कवीने मराठी संबोधनाचे देवा हे रूप वापरलेले काहे

नजर कर के मैं देकता हूं जिसे
तो हर घर के घर में देवा ! तूं दिसे । १०७१

मराठी म्हणी

मराठीची म्हण 'बैल गेला आणि झोंपा केला' आज आपल्यात या क्षीण रूपात शेष आहे. परंतु ३०० वर्षांपूर्वी तिचा बराच मोठा विस्तार असे वजहीच्या सबरस ग्रंथावरून दिसून येते. या म्हणीचा मराठीत प्रथम वापर कुठे ठिपतो हे मला ठाऊक नाही. पण वजहीचा वापर असा आहे.

होता बहुत झेलाझेल झाला
बैल गेला म्हागे झोंपा केला [पृ. १३२]

हाशमी कवीने 'सरडाची धाव कुपापातोर' ही म्हण रूढ असल्याचे नोंदविले आहे.

दुतन हिल मिल रही तो क्या करी मेरी बराबर कं
सुनी हूं जग मने मसला 'सरड की कूप लग
धावूं । १६४

वजहीने आपल्या काव्यात 'मागे आड व पुढे विहीर' या मराठी म्हणीचा वापर असा केला आहे.

अंगे बाइं है हौर पीछे कुवा
अंदेशा नको कर हुवा सो हुवा । ८०५

याच गद्यलेखकाने 'दूध पोळल्यावर ताक फुंकून पिणे' ह्या म्हणीला अशी कलाटणी दिली आहे.

दिल दुचीता. दूद का जल्या छाछ फूंक पीता. (पृ. २७६) 'चोरावर मोर' या म्हणीचा वापर वजहीने आपल्या अनुप्रासमय गद्यात असा उपयोग केलेला आहे.

किस्सा अजब घडया, चोर पर मोर पडया. (पृ. २८०).

मराठी ढब

ग्रामीण भागात बोलण्याची एक विशेष ढब आहे. खेड्यातील लोकांची बोलण्याची ही विशेष सभ्य पद्धत आपले येणे कसे झाले ? आपल्या येण्याचे कारण पुसण्याची ही शिष्ट पद्धत. वजहीने ती अशी वापरली आहे.

तेरा क्यों सकी यां लग आना हुवा
तुजे देक कर मैं दिवाना हुवा ।

नरेन्द्राच्या रुक्मिणी—स्वयंवरात खालील वापर आढळतो.

येथे बहुत दिन येसि क्षौणिशु म्हणे :
देशौनि कैं केलें निगणें ? १५०

तातडीचा निरोप पाठविला असेल तर खेड्यातली म्हातारी सांगेल—तिथं जेवला तर इथं हात धुवायला ये. हीच प्रथा वजहीने खालील चरणात वापरली आहे.

अगर घन उपर है तेरा शाह जी
तो वां खाना खा हौर यां पानी पी ।

पोटजाळी ही ग्रामीण मराठमोळी शिवी आहे. ही शिवी मुसलमान स्त्रियांच्या तोंडी असल्याची साक्ष हाशमीन दिली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुझ कहते हुयंगे लोगां छोरी कुं कुच कर्ता नैं
पिटियां-जली कूं क्या कऊ, कहती हूं घर में-हौ री।

पोट थंड होणे म्हणजे मुलेवाळे होणे. हा आशीर्वाद खेड्यातील स्त्रिया आजदेखील देतात. हाशमीच्या एका गजलेत हा आशिर्वाद आढळतो.

बिचाऱ्यां आ के जो तो वी मेरा दुक वांट लेत्यां हैं
बिबी नांदो थंडे बख्तों थंडा हो पेट बेगम का। १७

(येथे नांदो शब्दाचा रोख लक्षात घ्यावा)

काव्यप्रकारांची देण

मराठीतील ओवी हा एक छन्द असला तरी तो एक काव्यप्रकारही आहे. ग्रंथिक ओवी हा छन्द असू शकेल. पण स्त्रियांच्या तोंडची ओवी हा काव्यप्रकार मानता येईल. या ओवीने दक्खिनी हिंदीतही प्रवेश केलेला दिसून येतो: हिंदु बहुसंख्य महिलांच्या महासागरात मुसलमान महिला शतकानुशतके वावरत आली. स्त्रियांच्या ओवीने मुसलमान महिलांच्या अंत:करणात प्रवेश करणे अपरिहार्य होते. पुरुषसमाज इरानी संस्कृती व इरानी साहित्यसंकेत यांच्या आश्रयाने वागत असला तरी मुसलमान स्त्री मात्र ग्रामीण स्त्री जीवन व रूढी यांनी प्रभावित झालेली दिसून येते. यातूनच मराठी ओवीने मुसलमान महिला समाजात प्रवेश मिळविलेला दिसून येतो. दुर्दैवाने मुसलमानी स्त्रिया गात असलेल्या ओव्या उजेडात आलेल्या नाहीत. विजापुरी कवी हाशमी याच्या गजलांतून मुसलमान महिला ओव्या गात असत याचा निश्चित पुरावा उपलब्ध होतो. हाशमी हा मुसलमान शिपाई व त्याची पत्नी वा प्रेयसी यांचा कवी आहे. त्याच्या तीनशे साडेतीनशे गजलांच्या संग्रहांत या मुसलमान शिपायाच्या पत्नी-प्रेयसीचे मोठे मनोरम, बहुरंगी व सर्वकष असे चित्र दिसून येते. त्यामुळे तत्कालिन सामाजिक जीवनावर चांगलाच प्रकाश पडतो. हाशमी कवीने स्त्रियांच्या तोंडी असलेल्या ओवीचा दोनदा उल्लेख केलेला आहे. विद्वान संपादकांना ओई (ओवी) शब्दाचा अर्थ कळला असल्याचा कोठेही सुगावा लागत नाही. हाशमीने म्हटले आहे—

मेरा क्या यार चंचल है कती है रीझकर जो तो
दिए हैं हाशमी इज्जत हमारी ओई की बोली कों।
१८९।

यावरून दिसून येते की हाशमीने मुसलमान स्त्रियांच्या ओवी-बोलीचा आपल्या गजलात उपयोग केलेला आहे—

दुसऱ्या एका गजल-वरणात मुसलमान स्त्रिया ओवी गात असत असा उल्लेख हाशमीने केलेला आहे.

मुझे गाने कूं आता है क्यों आ गावूं ओई पडोसन पर
बिर्वी हो के नरत का वी लेती है तान बोलेगी। २७१

असे दिसून येते की, मुसलमान स्त्रिया ओव्या म्हणत. मराठीतल्या प्रमाणेच अशा ओव्या शेजारणीवरही गाइल्या जात.

लावणीचा प्रभाव

हाशमी कवीच्या गजलांमधून सर्वत्र लावणी वाङ्‌मयाचा प्रभाव दिसून येतो. शृंगारवर्णन, स्त्रियांच्या अनेक मनोभावांचे दिग्दर्शन यांच्या काव्यात दिसून येते. मराठीचे कवीश्रेष्ठ तावे यांच्याशी हाशमीची तुलना करता येते. दोघात फरक असा. तावे हे चालू शतकातील पांढरपेशा मध्यमवर्गातील सुशिक्षित तरुणीचे वर्णन करतात, तर हाशमी तीन शतकांपूर्वीच्या मुसलमान शिपायाच्या प्रेयसीचे वर्णन करतो. दोघांमध्ये भरपूर विविधता आढळून येते. परंतु हाशमीमध्ये लावणीच्या भावतरंगाच्या लाटा प्रचुरतेने दिसून येतात. अर्थात डोळा मारणे हे पहिले पाऊलच आहे.

जधां ते देख अचपल यो मुझे जो आंख मारा है
तधां ते बे-करारी का बिछू खूं डांक मारा है। २५७

ही जादू प्रभावी झाल्यानंतर चोळीपर्यंत मजल जाते. हाशमीने अनेक प्रसंगी चोळीचे खुबीदार वर्णन केले आहे.

जोवन के अत हुलालों सूं रही है दाब करने में
देखो क्या तटतटाती है सुघड जिवबहार की चोली। २४३

येथे उल्लेखिलेल्या जीवनाच्या बहार-वसंत ऋतूच्या चोळीतील विशाल अर्थाची दखल घेतल्यास बरे. तसेच तटतटणे हा शब्ददेखील स्मरणीय वाटावा. त्यामुळे शाहीर प्रभाकराच्या चरणाची आठवण होईल.

जरिकाठ कंचुकी ताठ, राठ गटगटली
खुलि पाठ दिसे तनु आठ, गाठ तटतटली।

अनेक रंगांच्या चोळ्यांचे वर्णन हाशमीने केले आहे. ही काळ्या पट्याची व क्षितिजाच्या रंगाची चोळी पाहा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पटचां हैं रात स्यां काल्यां अंख्यां तारे है, रंग चंदना
चंदरमुखी ने यो पहनी है शफक के सारकी चोली ।
कही घन हाशमी हंस कर लेती हूं सिर चढ़ा कर मैं
वही है आंख में मेरे तुम्हारे प्यार की चोली । २४३

काळ्या घडीच्या साडीत आपला जीव अडकला आहे असे सांगताना, आपल्या प्रेमालापप्रसंगी राजकीय जीवनातील उपमादृष्टान्त देण्याच्या प्रयेस अनुसरून, हाशमीने औरंगजेबाचा कर्नाटकात कसा सिक्का बसला होता, हे सांगितले आहे,

काली घडी में घन तेरी बैठा है मेरा जीव यूं
बैठा है कर्नाटक में ज्यूं सिक्का सो आलमगीर का । २

हाशमीने शिवाजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, छत्रपति राजाराम, रामचन्द्रपंत अमात्य, अब्दुला कुतुबशाह, मादण्णा वमन (ब्राह्मण) इत्यादिचे दृष्टान्त-रूपाने मोठे मार्मिक उल्लेख केलेले आहेत. याचा मी स्वतंत्र रीतीने विचार केलेला आहे.

कै. दत्तू वान्देकर यांनी 'तो आणि ती' च्या रूपाने स्त्री-पुरुष प्रेमसंबंधाच्या छटा मराठी माणसास दाखविलेल्या आहेत. हाशमीने, प्रियकर-प्रेयसीच्या प्रेमालापांचे संवाद 'तो आणि ती' च्या रूपाने तीनशे वर्षांपूर्वी रंगविलेले आहेत. असे दहा पंधरा प्रेमालाप संवाद त्याच्या गजलसंग्रहात उपलब्ध आहेत. त्याचा एक नमुना असा. योग असा की, त्यात शिवाजीचा दृष्टान्त दिलेला आहे.

मैं यूं कहा, "कुछ कर तेरे ले हात में कुच दंद करूं"
कई, "सच सिवा ने दंद किया
कोकन गड बलकाए पर ।" ८६

श्रृंगारालापाबरोबरच स्त्रीच्या पतिप्रेमाची व पातिव्रत्याचीही अनेक शब्दचित्रे हाशमीने रंगविलेली आहेत. पतिविरहामुळे अश्रू ढाळीत असलेल्या पतिव्रता स्त्रीच्या अश्रूंना हाशमीने किशनाभिवरेच्या संगमाची, केवळ मराठमोळा उपमा दिलेली आहे.

अंख्यां भिवरा सो किश्ना हो सदा भर पूर वहत्यां हैं
अंझू भर गोद में मेरे तीरत पकड्या है संगम का । १७

व्याकरणाचा प्रभाव

व्याकरणाच्या संपर्काचा विचार करीत असतांना, फक्त तृतीया विभक्तीच महत्त्वाची ठरते. तसे पाहिले तर सर्वच आर्यभारतीय भाषांत तृतीया विभक्तीचा घुमाकूळ आहे. तसा तो दक्खिनीतही आहे. खालील उदाहरणे पाहा.

१) एके बीजें बीज अपार (बुर्हानुद्दीन जानम)
२) न बूझें बूझा जावे (जानम)
३) जग की हासें क्या मुझ होवे (जानम)
४) योग अभ्यासें ध्यान (मीरांजी)
५) तुई मुंज हातों धन्या (मीरांजी)

वरील उदाहरणात तृतीयेचा एं, ईं प्रत्यय प्रयुक्त झालेला आपणाला दिसून येईल. हाच प्रत्यय आपणाला मराठीत, जुन्या व नव्या, वापरलेला दिसून येतो.

गवासीने 'जिसें मारना' हा तृतीयान्त वाक्प्रचार असा वापरलेला आहे.

कि उस के जिवें मार कर भाई कू
सरांदील के राज की जाई कूं ।

तोतीनामा मस्नवीत त्याने त्याचे रूपान्तर 'जिवां मारना' असे केलेले आहे.

साहगम्य

संस्कृतमध्ये विशेष्याची विभक्ति विशेषणास मिळते. ही प्रथा जुन्या मराठीत सर्वत्र आढळून येते. म्हाइंभटाच्या श्रीकृष्णचरित्रातील खालील उदाहरणे पाहा.

१) मग साष्टांगें दंडवते घातलीं (पान ३८.३१)
२) अें फूलें कृष्णा तुजलागि आणिलीं (४.२८)
३) ए पितांवरें वस्त्रें श्रीकृष्णाचि होती (४९.३४)
४) तेथ एकें दंपत्यें ब्राह्मणें होतीं (५५.१३)

दक्खिनी हिंदीतही ही परम्परा फार जुनी आहे. एकूण एक साहित्यिकात ती आढळून येते. वजहीचे चरण पाहा.

जित्यां खूब खुशशक्ल थ्यां सुंदर्‍यां
सो कर्नाट हौर गौड, गुजरात क्यां ।

येथे आपणाला असे दिसून येते की विशेष्याप्रमाणे विशेषणाचे अनेकवचन तर आहेच, परंतु क्रियापदाचे आणि प्रत्ययाचे पण अनेकवचन केलेले आहे. याची अनेक उदाहरणे देता येतील. या प्रथेला व्याकरणातील साहगम्य असे नाव देता येईल. कदाचित् ही प्रथा सर्वच भाषातील जुन्या रूपात आढळणे शक्य आहे. माझ्या एका लेखा सन्दर्भात ही प्रथा जुन्या जावीत उपलब्ध आहे असे डॉ. गोपीचंद नारंग या उर्दूभाषी विद्वानाने एका लेखात प्रतिपादिले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कर्ताकारक ने प्रत्यय

मराठी भाषेने दक्खिनी हिंदीला आणि पर्यायाने आपल्या राष्ट्रभाषा हिंदी अथवा उर्दूला दिलेली ललामभूत देणगी म्हणजे तृतीयेचा कर्ताकारक ने प्रत्यय. या प्रश्नात येथे शिरणे कठीण. माझ्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद, अलीगढ अधिवेशना-(शके १८८८) मध्ये वाचलेल्या एतत्संबंधी प्रबंधात मी सविस्तर चर्चा केलेली आहे. तो आता इतिवृत्तात प्रकाशित होत आहे. खोलात न जाता मूळ मुद्दा पाहाणे बरे होईल. खालील वाक्ये पाहावीत. गेसू दराज यांची खालील वाक्ये पाहा—

१) उन्ने भी तलब होवेगा (पा ६१.१३)

२) उन्ने दरख्त का मेवा भी खावेगा (पा ७८.१८)

याच्या जोडीला मराठी सूत्रपाठाची पुढील वाक्ये ताडून पाहा.

१) तुमचेनि मुंगि रांड न होआवी

२) जीतेनि मृताचां धर्मी वर्तावें ।

मराठीतील भविष्यकाळाला अनुसरून वरील दक्खिनीतील ने प्रत्ययाचा वापर सुयोग्य ठरतो. परंतु अलीकडील उर्दूभाषी विद्वानांनी तो चुकीचा असल्याचे थोतांड उभे केले आहे. तसेच खालील वाक्यांची तुलना करावी.

१) सालिक ने सचा होना; पीर के भाते में आप कू वेना.

२) वेनमक खाने ते आदमी ने क्या सवाद पाया.

३) इन्सान ने इतना तो हासिल करना कि बा रे नमाज किए लगन उसे खुदा बिन कुच याद ना आवे.

४) आदमी ने खुदा के कामां समझ कर चुप रहना.

५) उनो कों अपस ने राजी रखना, उनो की दुआ लेना, यो बहुत अदब की ठावुं है.

६) नेकां ने नेकी करना; दुनिया में नेकी ना विसरना.

आता या वाक्यांची मराठी वाक्याशी तुलना पाहावी.

१) विश्वात्मकें देवें तोखावें (ज्ञानेश्वरी)

२) तुम्हीं ऐसें होआवें (सूत्रपाठ)

३) ते आइकावें श्रोतां (शिशुपालवध)

या तुलनेवरून दिसून येईल की दक्खिनीतील ने प्रत्ययाचा उपयोग मराठी पद्धतीस अनुसरूनच आहे. त्यात चूक असे काहीच नाही. पुढील वाक्यातील ने प्रत्ययाचा उपयोग उर्दूभाषी पंडितांनाही योग्य वाटतो. "दिल में हुई आनी, डालीने झाड ने जुदा कर जानी."

आणखी एक गोष्ट अशी की कुतुबशाहक या शक १३५०-च्या आगेमागे लिहिल्या गेलेल्या खडीबोली अर्थातच दक्खिनी हिंदीच्या नागरीलिपिबद्ध ग्रंथात ने प्रत्ययाचा वापर मुळीच दिसून येत नाही. या ग्रंथात इ-ई. ए-एं, हीं, अं आदि प्रत्ययांनी ने प्रत्ययाचे काम भागविले आहे. परंतु ने प्रत्ययाचा मात्र अभाव दिसून येतो. याच्या उलट नामदेवाच्या, गुरुग्रंथसाहेबात समाविष्ट असलेल्या हिंदी पदात मात्र ज्ञानेश्वरीतल्या ने प्रत्ययाच्या रूपातच, ने चा वापर केलेला दिसून येतो. नामदेवाची एकदोन उदाहरणे-पाहा.

गुड मीठा राम गुड मीठा ।
जिनि लह्या तिनि गुन दीठा । टेक-८७
नैननि पाया श्रवननि साया ।
तृपित भई त्रिला मत्रि माया । १
बीहीं बीहीं तेरी सबल माया ।
आगैं इनि अनेक भरमाया ।। टेक-३९

सार असे की, खडीबोली अथवा तिचे उत्तरकालीन रूप दक्खिनी हिंदी या भाषेत ने प्रत्ययाचा अभाव होता. हा ने मराठीच्या साहचर्यामुळे या भाषेत प्रविष्ट झाला व स्थिरावला. ही मराठीची राष्ट्रभाषा हिंदीला अपूर्व अशी देण होय.

महाराष्ट्रभूमीचा प्रभाव

मी एका लेखात मराठी भूमी ही राष्ट्रभाषा हिंदीची धात्रीभूमी आहे असे म्हटले होते. याची येथे पुन: आठवण करावी असे मला वाटते. ज्याप्रमाणे मराठी भाषेने दक्खिनी हिंदीला आपली शब्दसंपत्ति, वाक्प्रचार-भांडार, म्हणीचे अलंकार आणि व्याकरणाची जीवन-कला अर्पण केलेली आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रभूमीने या भाषेला नद्या, पर्वत, गडकिल्ले, हवापाणी इत्यादींची विषयसंपत्ति अर्पित केलेली आहे. या विषयावर एक स्वतंत्र व्याख्यान देता येण्यासारखे आहे. या संदर्भात दोन कवी महत्त्वाचे होत. ते नुस्रती आणि हाशमी होत. दोघेही विजापूरकर आहे. नुस्रतीने अलीनामा ग्रंथात पन्हाळगडाचे अप्रतिम वर्णन केलेले आहे. या वर्णनात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(अध्याय १२ वा) पन्हाळयाचे राज्याला आधारभुतत्व (श्लोक ७१), गडाची विशालता (७२, ७३), त्याची उत्तुंगता (७४, ७५), त्याची दुर्गमता, (७६,७७), त्याच्या भोवतालील घनदाट अरण्ये (७८), त्याच्या दऱ्याखोऱ्याची सखोलता (७९). गडावरील पाण्याची विपुलता (८०, ८१), गडाची अजिंक्यता व अभेद्यता (८२, ८३, ८४) आणि अंती त्यावेळी गडावरील साहित्याची विपुलता (८५) कवीने मोठ्या बहारदार रीतीने वर्णिली आहेत. (या संदर्भात माझा 'स्वातंत्र्य-रक्षणात सह्याद्रीचे स्थान—इतिहास आणि संस्कृति, पुस्तक ४ थे शक १८८९ पाहावे) याशिवाय नुस्रतीने सिंहगड व पुरंदर याचे ओझरते वर्णन केले आहे. कोकणची वनश्री व जलाशये यांची नुस्रतीची वर्णने महाकवीला साजेशी आहे. मलनाद (दक्षिण कानरा व धारवाड जिल्हे) प्रदेशातील एका जलाशयाचे वर्णन प्रदेशातील एका जलाशयाचे वर्णन पाहा.

इता कुच हौज डोंगा है फलक जां तैरने सिकने
ले आया खोड सांगड आज खांदे सट
चदर गुल का। १६.४३

अछे अच्छेपने ने अत सफाई आब की ऐसी
दिस आवे तल लगे पर जा सटे
गर दाना चावल का। १६.४४

आता कोकणातील फळपुष्पांचे वर्णन पाहा
कची किस घांस जडवां [हो] निचे पन अंबरीं वाला
सुका कैं खोड अगर है तो अछे ओ खोड संदल का। १६.५४
कमीना बेल सिरसी हौर चेवड वेलीच पनवाडी
अछे जो झाड अदना सो कलनफर
या है जाफल का। १६.५५

दुसऱ्या एका ठिकाणी फलराज आंबा आणि फल-रसिक फणस याचे वर्णन पाहा

आंबा - मऱ्या कूजा हर आंब का नीज सात
जमूए हैं पन भा को आवे-हयात। २६.२६
नारळ—निछल जलमें शालू के घर आई थंडी
जमूए जूं कि अम्रित दही की हंडी। २६.२९
फणस— तुर्फा संदूक है खानादार
भऱ्या मेवा हरे खाने भितर दिल-बहार। २६.४०

हाशमी कवीने आपल्या गजलांमधून महाराष्ट्रातील व त्याच्या आसमन्तातील अनेक ऐतिहासिक ठिकाणे व किल्ले यांचा उल्लेख केलेला आहे. हे उल्लेखमात्र आहेत, त्यांची वर्णने नव्हत. परंतु त्यात त्या त्या ठिकाणाचे काही तरी वैशिष्ट्य उल्लेखिलेले आहे. महाराष्ट्रातील स्थाने:—अहमदनगर, उदगीर, खेलना, गोरेगाव जावळी, घोंडप, नलदुर्ग, परडा, पर्नार (पन्हाळा), वडूर, बरमपुरी, बालापूर, बुर्हानपूर, बोरीचा घाट, राई व राहीरी (रायगड) ललिग, शाहपूर, सोलापूर, सातारा इत्यादि. महाराष्ट्राबाहेरील स्थान:—असीर, अघोनी, कडपा, कंवल (कर्नूल), गुलबर्गा, गोवलकुंडा, गौड चंजावर, जिंजी, तिरचनापली, दिल्ली, पलकोंडा, बंदर (मछलीपटन), बीजापूर, रायचूर, सगूर, सेडम, सिरंगपटन, हनवल इत्यादि. ही स्थाने निदान मुसल-मानी सत्तेची केन्द्रे होती.

अशाप्रकारची वर्णने मराठीत क्वचितच सापडतील असे वाटते.

भिवरा व किश्ना

एका पतिव्रता विरहिणीची प्रेमव्यथा वर्णन करीत असतांना, तिच्या अश्रुधारांना हाशमी कवीने भिवरा व किश्ना नद्यांच्या प्रवाहाची अत्यंत समर्पक मराठमोळी उपमा दिलेली आहे.

अंख्यां भिवरा सो किश्ना हो सदा भर पूर वहत्यां हैं।
अंझू भर गोद में मेरे तिरत पकड्या है
संगम का (गजल १७५)

पतिव्रता विरहव्याधीने व्याकूळ झालेली आहे. तिचे डोळे, दुथडी पूर येऊन वाहणाऱ्या भिवरा व किश्ना नद्या बनलेले आहेत. माझ्या (विरहिणीच्या) वक्ष-स्थलावर लोंढे वाहात येऊन त्यांना संगमाच्या तीर्थाचा महिमा व पावित्र्य प्राप्त झालेले आहे.

वरील कडवे अनेक दृष्टींनी लक्ष्य व आकर्षणीय आहे. येथे हाशमी हा कवी महाराष्ट्राशी कसा तादात्म्य पावलेला आहे हे दिसून येते. त्याने डोळ्यांतून वाह-णाऱ्या अपूश्रुरांना तायग्रिस व युफ्रेतीस या नद्यांच्या पुरांची उपमा दिलेली नाही. मराठी माणसाच्या ओठावर घोळत असलेल्या

गंगा जमना डोळ्यात अशा का ?

असाही उल्लेख करणे त्याने पसंत केले नाही. तर महाराष्ट्रसंस्कृतीच्या वाहक नद्या भीमा व कृष्णा यांनाच त्याने भागीरथी यमुनेच्या संगमाचे माहात्म्य प्रदान केले आहे. भिवरेकृष्णेच्या सगमाला तीर्थत्व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राप्त करून देण्याची मराठी मनाची ठेवणच हाशमीच्या सांस्कृतिक मनोभूमीत जोपासलेलीं दिसून येते. या ठिकाणी वसिष्ठाच्या कामधेनूच्या पाठीमागून जाणाऱ्या दिलीपपत्नी सुदक्षिणेला पाहून कालिदासाने भारतीय संस्कृतीचे पावित्र्य डोळ्यांपुढे उभे केलेल्या

तस्याः खुरन्यासपवित्रपांसुमपांसुलानां धुरि कीर्तनीया ।
मार्गं मनुष्येश्वरधर्मपत्नी श्रुतेरिवार्थं स्मृतिरन्वगच्छत् ।।

या श्रेष्ठ उपमेचीं आठवण झाल्याशिवाय राहात नाही. दोघांचा वर्ण्यविषय व मापा वेगळी असली तरी द्वितीय इब्राहीम आदिलशाह (मृत्यु शक १५४९) याच्या शब्दात बोलायचे झाल्यास

माका न्यारी न्यारी भाव एक
कहा तुरुक कहा बरहामन ।;

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी संचालकांतर्फे प्रकाशित

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गालिब शताब्दि महोत्सवानिमित्त गालिब याच्या जीवन व काव्यरचनेबद्दल संक्षिप्त लेख

उर्दू काव्याचे कवि कुलगुरु

मिर्जा गालिब

नाना शेंडे

अुर्दू काव्यातील त्रिमुर्ती म्हणजे मीर, गालिब आणि इक्बाल हे होत. त्यांतहि निवड करायची म्हटली तर मिर्जा गालिब याला अुर्दूचा सर्वश्रेष्ट कवि म्हणजे कवि-कुलगुरु समजावा लागेल. त्याची अुर्दू काव्यरचना विपूल नाही, विपूल आहे ती फारसी भाषेतील काव्य-रचना किंबहुना "माझ्या काव्यांतील खराखुरा रस चाखायचा असेल तर फारसी काव्य वाचा ; नीरस अुर्दू काव्य कशाला वाचता" अशी गालिबने पुढील काव्यपंक्तितून सुचना केली आहे.

“ फारसी बीन ताबबीनीं नक्शहाये रंगारंग
बगुजर अज मजमुए अुर्दूके बेरंगे मन अस्त”

परंतु असे जरी असले तरी गालिबच्या अुर्दू काव्यरचना दृष्टिआड करता येणार नाहीत. गालिबचे मृत्यू होवून आज १०० वर्षे होवूं पहात आहेत तरी पण त्याची लोकप्रियता आणि त्याच्या वाङमयाचा अभ्यास या गोष्टी अद्यापहि यत्किंचितसुद्धा कमी झालेल्या नाहीत अुलट त्या दिवसेंदिवस वाढत आहेत. आणि यांतच गालिबचे श्रेष्ठत्व सामावलेले आहे.

गालिबच्या कविता रंजनात्मक तर असतात शिवाय त्यांत गांभीर्य सुद्धा असतं. त्यांत जीवनाचे अतिशय सुक्ष्मतेने विवेचन करुन ज्ञानबद्ध चाकोरीची परिसीमा गांठलेली असते. कल्पनांचा तरलपणा, उपमाप्रमेयांची गर्दी, प्रणयाच्या निरनिराळ्या अवस्थांची साद्यंत हकिकत आणि तत्वज्ञानपर वैचारिक बैठक, विलक्षण भाषेच्या प्रभुत्वातर्गत प्रस्फुटित होवून हृदयसिंहासनावर अवि-राज्य प्रस्थापित करतात. बुद्धीला भांबावून सोडतात. गालिबने आपल्या काळअंतर्गत प्रेम, प्रेमिका, प्रेयसी, उत्कंठा, विरह, वियोग व मिलन या तत्कालीन महत्व-पूर्ण नि प्रचलित विषयांना साकार करुन सजविलेलं आहे. त्याची काव्यरचना (अुर्दू) विपुल नाही आणि जी आहे तिचा बव्हंशीं भाग 'गजल' या पद्यप्रकाराने व्यापला आहे. त्याचे अुर्दूतील प्रकाशित वाङमय म्हणजे 'दिवान' हा कविता संग्रह. हा कवितासंग्रह तसा कांही विशेष मोठा नाही. त्याची निश्चित संख्या २२५ ही आहे. तसेच २५-३० कसीदा म्हणजे स्तुतिपर कविता, रुबाया आणि कांही प्रासंगिक कविता मिळून तीनएक हजार ओळी भरतील हे अत्यल्प प्रमाणांत भरणारं वाङमय असले तरी अुर्दूच्या काव्यविश्वांत अमर होवून बसलं आहे. त्यामुळं इतर कविच्या मानानं गालिबला विल-क्षण प्रसिद्धी आणि लोकप्रियता लाभून त्याला उस्ताद म्हणजे कवि कुलगुरु म्हणून त्याच्या हयातीतच मान मिळुं लागला. अुर्दू भाषेतील इतर प्रकाशित प्रसिद्ध वाङमय म्हणजे पत्रांचा प्रचंड संग्रह होय. त्याच्या या पत्रांनी अुर्दू गद्याला सोपे आणि सुटसुटीत वळण लावले. अुर्दू गद्याच्या घटनेंत या पत्रसंग्रहाने असामान्य स्थान पटकाविलं आहे.

गालिबचा जन्म २७ डिसेंबर १७९७ रोजी आग्रा येथे झाला. त्याचे वडिल आणि चुलता यांचे मृत्यु त्याचे बाल-पणीच झाले असल्यामुळें त्याचे पालनपोषण गालिबच्या आजोळी झाले. गालिबचे शिक्षण नजीर अकबराबादी व महंमद मोअज्जम या विद्वानांच्या देखरेखी खाली झाले. गालिबचे घराणे हे मुळचे मध्य आशियांतील समरकंदचें. ते वंशाने तूर्क होते. मिर्जा गालिब वयाच्या ९-१० वर्षा-पासून काव्य लेखन करु लागला. गालिबच्या काव्याला खरा बहर आला तो दिल्ली येथे. कारण त्याचा ओढा फारसीकडुन अुर्दूकडे वळला. तो शहरांत ठिकठिकाणी होत असलेल्या कवीसम्मेलनांत भाग घेवुं लागल्यामुळे. इ. स. १८५४ मध्यें जौक या कवीचा मृत्यू झाल्या-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुळें बहादूरशहा जफरने जौकची राजकवीची जागा गालिबला दिली. अशा रितीने गालिबला राजकवी म्हणून मान्यता मिळाल्यावर त्याच्या जीवनात स्थैर्य निर्माण झाले. यापूर्वी आर्थिक विवंचनेच्या पायी तो देशातील प्रमुख शहरी वावरू लागला. तरी पण त्याच्या काव्यलेखनात खंड असा कधी पडलाच नाही. त्याच्या 'दीवान' या कवितासग्रहातील प्रसिद्ध केलेल्या कवितांत जीवन, जीवनातील संघर्ष, आशानिराशांचे द्वंद्व, सृष्टि-विषयक तत्वज्ञान, धर्म आणि धार्मिक रुढिसंबंधीचे विचार हे त्याने अत्यंत लीलेने व सहजतेने हाताळलेले आहेत. किंबहुना हे त्याचे वैशिष्टचपूर्ण कवनरचना कार्य आहे. जीवन म्हणजे संघर्ष होय. परिस्थितीशी संघर्ष हा सतत व अटळ आहे. जीवनात शोकाचे आधिक्य आहे आणि यातून सुटका म्हणजे मरण हे त्याने वर्तविलेले जीवनसत्य व जीवनतत्व होय जीवनातील दु:खाने गालिबला घायाळ केलें असल्यामुळे त्याच्या मुखावाटे निराशेचे व दु:खाचे उद्गार बाहेर पडतात.

गालिबचे एकंदरीत आयुष्य हे अतीव दगदगीने व त्रासाने व्यापले होते. त्याची आर्थिक स्थिती फारच अल्प काळ सोडला तर कधीहि सुदृढ नव्हती. आपल्या बहात्तर वर्षाच्या कारकिर्दीत गालिबला जीवनाचा आणि त्यातील सुखदु:खाचा जो अनुभव आला त्यामुळे अत्यत उद्वीग्न मन:स्थितीत त्याने हे उद्गार काढले आहेत.

मेरे किस्मतमें गम गर इतना था
दिल भी यारब कई दिये होते

(हे परमेश्वरा, माझ्या नशिबांत तू इतकी दु:खे लिहली होतीस तर ती सारी सहन करण्यास हृदयें तरी अनेक द्यायची होतीस) आणि ही दु:ख सहन करण्याची समर्थता प्रकट करून लगेच हा श्रेष्ठ कवी म्हणतो की,

दिल ही तो है न संग व खिश्त दर्दसे भर
न आये क्यों
रोवेंगे हम हजार वार कोई हमें सताये क्यों

(हे हृदय शेवटी हृदयच आहे ते काही दगड नव्हे, की धोंडा नव्हे. ते व्यथेनें कां वरे भरून येणार नाही ? आम्ही अनंत वेळा रडू पण रडू देण्यात आम्हाला कुणी का वरे त्रास द्यावा?)

गालिबचे खरे नाव मिर्जा असदुल्लाखान हे होय. गालिब आणि असद ही त्याची काव्यप्रांतातील टोपण नावे होत. मिर्जा गालिब यांचा स्वभाव अत्यंत खर्चिक होता आणि त्याला मदिरेचे जबर व्यसन होते. दररोज दारू प्यालयाशिवाय त्याला स्वस्थता वाटत नसे. माझ्या-समोर मदिरापात्र ठेवा आणि मग बघा माझ्या तोंडा-तून शब्दसुमने कशी बाहेर पडतात तीं. माझ्या हातात शक्ति नसेल पण डोळचात तर आहे ना ! मदिरेची सुरई अन् पात्रें माझ्या डोळचासमोर राहू द्या कसे ! मदिरा सेवनाचा आनंद कुणाला हवा आहे ! स्वत:ला अन् जगाला विसरून जाण्यासाठी मदिरा हवीच. असे कितीतरी उद्गार गालिबच्या काव्यात आढळून येतात.

आपल्या बहात्तर वर्षाच्या दीर्घ आयुष्यात मिर्जा गालिबने विपूल अशी ग्रंथ रचना केली. उर्दू आणि फारशी भाषेवर त्याचे असाधारण प्रभुत्व होते. उर्दूतील त्याचे प्रमुख ग्रंथ म्हणजे उर्दू कविताचा संग्रह व प्रचंड पत्रव्यवहार हे सोडले तर फारसी साहित्य त्यात त्याने एक कवितासंग्रह, तैमुर घराण्याचा इतिहासाचा प्रारंभीचा भाग मेहेरे नीमरोज, फारसी पत्रव्यवहार आणि अठराशे सत्तावनच्या प्रसंगीचा ग्रंथ दस्तंवो हे एवढे लिहून महत्वाची भर घातली आहे. असा हा थोर व अग्रगण्य उर्दू कवी इ. स. १८६९ साली पैगंबरवासी झाला. आपल्या वाङ्मयीन कृति जगात अजरामर करूनच. यंदा होत असलेल्या गालिब शताब्दि महोत्सवा-निमित्त त्याच्या त्या प्रतिभाशाली व कर्तृत्वशाली व्यक्तिमत्वास शतश: प्रणाम !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

.... पुस्तक परीक्षण ....

चंबळेच्या पलीकडे

लेखक:—श्री. स. शं. देसाई

विदर्भ मराठवाडा बुक कं., पुणे २. कि.-१५ रु.

'चंवळेच्या पलिकडे' ही श्री. स. शं. देसाई यांची गेल्या वर्षी प्रकाशित झालेली ऐतिहासिक कादंबरी आहे. गेल्या काही वर्षात ऐतिहासिक कादंबऱ्या जास्त लिहिल्या जाऊ लागल्या आहेत. इतिहासाच्या मर्यादित चौकटीत राहून सृजनशीलतेने कादंवरी रचण्याचे ललित लेखकाला मिळालेले आव्हान अनेक लेखक स्वीकारताना दिसतात. त्या प्रकारातील आणखी एक कादंबरी प्रस्तुत लेखकाने वाचकापुढे सादर केली आहे. मराठीमध्ये अनेक इतिहास प्रसिद्ध व्यक्तिवर खूप लिहिले गेले. तथापि काही व्यक्ति गुणी असूनही उपेक्षित व दुर्लक्षित राहिल्यात. त्या व्यक्तीचे मूल्यमापन जसे होणे अगत्याचे होते तसे झाले नाही. तेव्हा अशा काही व्यक्ती असतील तर त्यांना न्याय देण्याचा एक प्रयत्न म्हणून प्रस्तुत कादंबरीकडे वाचकांनी पाहावे. प्रस्तुत कादंबरी ही महादजी शिंदे या पेशवाईमधील मातबर सरदाराभोवती गुंफली आहे. महादजी शिंदे हे कादंबरीचे केन्द्रबिंदू असून या केन्द्रबिंदुभोवती सर्व घटना, प्रसंग व पात्रे फिरतात कादंबरीची सुरुवात पानपतच्या प्रसिद्ध लढाईपासून झाली असून महादजीचा अंत होईपर्यंत महादजींच्या जीवनात ज्या अनेक रोमहर्षक व चित्तथरारक घटना घडल्या त्यांचे यथार्थ दर्शन लेखकाने येथे घडविले आहे. महादजीची प्रतिभासंपन्न सेनापती या नात्याने समोर उभी राहणारी प्रतिमा ही नेपोलियनच्या प्रतिमेपेक्षा तिळमात्रही कमी नव्हती हे सांगून समयसूचकता, असीम पराक्रम व दूरदर्शित्व इ. त्याच्या गुणांचे मनोज्ञ दर्शन येथे लेखकाने रेखाटले आहे. एकसंघ मराठेशाहीचे भव्य स्वप्न पाहणाऱ्या महादजींची जीवनगाथा शब्दांकित करण्याच्या प्रयत्नात लेखकाने त्याच्या अंतरीच्या व्यथाही नाजूकपणे उलगडून दाखविल्या आहेत. कादंवरीची भाषा ऐतिहासिक वातावरणास अनुकुल असून ओघवती व प्रसन्न आहे. प्रस्तुत कादंवरी लिहून श्री. स. शं. देसाई यांनी आपल्याबद्दलच्या वाचकाच्या अपेक्षा अधिक उंचावल्या आहेत.

प्रा.-चंद्रकांत ब्रम्हे (यवतमाळ)

* * *

पुस्तक परिचय

चंद्रकांत कुळकर्णी

पु. शि. रेगे वाङमय दर्शन

प्रकाशक :—मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

किंमत चार रुपये

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या विद्यमाने प्रतिवर्षी एखाद्या साहित्यविषयक, शास्त्रीय, शैक्षणिक किंवा सामाजिक विषयावर शारदोत्सव व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

यावर्षी नेहमीची प्रथा मोडून सुप्रसिद्ध कवी, कादंवरीकार व टीकाकार आणि वर्धा येथे झाले अट्ठेचाळीसाव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य पुरुषोत्तम शिवराम रेगे यांच्या विविध प्रकाऱ्च्या साहित्य निर्मितीवर यंदाची शारदोत्सव व्याख्यानामाला आयोजित करण्यात आली.

या व्याख्यानमालेत स्वतः प्राचार्य रेगे "माझी साहित्यविषयक भूमिका" या विषयावर बोलते. याशिवाय प्राचार्य रेगे यांची :कथा-कादंबरी, नाट्य, कविता, साहित्य-विचार, संपादन, या विषयांवर अनुक्रमे प्रा. गंगाधर पाटील, श्री. चि. त्र्यं. खानोलकर-श्री, दिलीप चित्रे, प्रा. गं. ब ग्रामोपाध्ये, प्रा. रा. भि जोशी यांची अभ्यापूर्ण व्याख्याने झाली.

ही व्याख्यानमाला एकत्रीत करून पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

या पुस्तकाच्या सोबत कु. लतिका जोशी यांनी तयार केलेली 'छंद' या द्वैमासिकाच्या पाच वर्षांतील लेखांची व लेखकांची महत्वाची विस्तृत सूचि जोडण्यात आली आहे ती अभ्यासकांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे.

* * *

गीत सौभद्र

लेखक :–ग. दि. माडगूळकर

प्रकाशक :–सोमैय्या पब्लिकेशन्स

किमत–रुपये पाच

गीतकार माडगूळकर हा मात्र 'सौभद्र' नाटकासारखाच चमत्कार वाटतो. (इति–पु. ल. दे.) 'सहज बोलणे तरी उपदेश' असे संतांविषयी म्हणतात. माडगूळकरांची गीतरचना सहजपणाची ती उंची गाठते. माडगूळकर हे नाव आज मराठी मुलुखात पुरणपोळी इतके लोकप्रिय आहे. सोप्या शब्दांतून अर्थाची गहन बीजे फुलविणाऱ्या प्रतिभेची तर माडगूळकरांना देणगीच आहे. 'जोगीया', 'गीत रामायण', 'गीतगोपाल', 'चैत्रवन', इ. त्यांच्या काव्य संग्रहातून वरील विधानाची प्रचीती काव्यरसिकांना वारंवार येते. 'गीतसौभद्र' वाचतांना याच गुणांचा प्रत्यय पुन्हा येतो. सुभद्रेच्या लग्नाची कथा अण्णा किर्लोस्करांनी 'सौभद्र' नाटकात सांगितली. अण्णा माडगूळकरांची त्यातल्या गद्याचीही गीते केली. आणि सौभद्राचे 'गीत सौभद्र' केले.

सुभद्रेच्या प्रणयपूर्तीची ही संपूर्ण गीतालंकांनी नटलेली नाटचकथा ललितकलादर्शकांनी सादर केली. पु. ल. देशपांडयांची मार्मिक परंतु अत्यत रसाळ प्रस्तावना हे या पुस्तकाचे महत्वाचे वैशिष्ट.

* * *

मराठी नाटच-समीक्षा

(१८६५ ते १९३५)

लेखक :–रा. शं. वाळिंबे

प्रकाशक :–पुणे विद्यापीठ मूल्य–सोळा रुपये

१९६६ सालच्या आक्टोबर महिन्यात पुणे विद्यापीठाच्या वतीने होणाऱ्या केळकर व्याख्यानमालेत श्री. रा. शं. वाळिंबे यांनी मला व्याख्याने दिली. या व्याख्यानांच्या आधाराने प्रस्तुत ग्रंथ तयार करण्यात आला आहे.

मराठींतील नाटचसमीक्षेचा शक्य तितका कालानुक्रम सांभाळून इतिहास सांगणे हा प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे. नाटकांची परीक्षणें; रंगभूमीवरील प्रयोगांची हरीक्षणें; नाटचविषयक तात्त्विक चर्चा, नाटचव्यवसायाशीं संबद्ध असलेल्या प्रश्नांची चर्चा; अभिनय, नेपथ्य, देखावे इत्यादींची चर्चा; अभिनय कलेचे सशास्त्र शिक्षण, रंगभूमीवरील संगीत, रंगभूमीवरील स्त्रियांच्या भूमिका, प्रेक्षकांची जबाबदारी, टीका आणि टीकाकार; आणि जुन्याकाळी होऊन गेलेल्या श्रेष्ठ नटांच्या कर्तबगारीचे विवेचन व जुन्या नाटककारांचा परिचय इत्यादि विषयांचा अंतर्भाव या ग्रंथात केला आहे.

ग्रंथातील विवेचन पूर्ण झाल्यावर वेगवेगळचा परिशिष्टांमध्ये ज्यांचा ग्रंथ लिहिण्याच्या कामी प्रत्यक्ष उपयोग करून घेतला आहे. अशा वर्तमानपत्राची व मासिकांची कालानुक्रमाने सूची दिली आहे. आणि विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे 'रंगभूमि' मासिकातील वहुतेक सर्व लेखांचे विषयवारीने वर्गीकरण करून त्यांची पुन्हा कालानुक्रमाने सूची दिली आहे. ही सूची अभ्यासकांना फार मोलाची वाटेल.

* * *

सर्वोत्कृष्ट मराठी कथा

संपादक :–राम कोलारकर

प्रकाशक:–पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

मूल्य–दहा रुपये

मराठी वाङ्मयात मराठी लघुकथेचा फार मोठा विस्तार झाला आहे. मराठीतील या समृद्ध वाङ्मयप्रकाराने जागतिक वाङ्मयात मानाचे स्थान मिळवावे इतकी त्याने प्रगती केली आहे. हरिभाऊ आपटयांनी लावलेल्या या 'इवल्याश्या' रोपटयाचे प्रचंड वृक्षांत रूपांतर झाले आहे. परंतु लघुकथेचा इतका विकास होऊन या वाङ्मय-प्रकारावर समीक्षणात्मक लिखाण फारच थोडे लिहिलेले आहे. या दृष्टीने नागपूरचे कथावेडे तरुण समीक्षक श्री. राम कोलारकर यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुरू केलेला हा प्रयत्न फार महत्वाचा आहे. कोलारकरांची ही योजना चार खंडात राहणार असून प्रस्तुत खंड आहे. यात १८५४ ते १९२४ या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या ३४ कथा निवडण्यात आल्या आहेत. या निवडलेल्या कथांत अनेक अप्रसिद्ध कथाकारांच्या कथा आहेत. राम कोलारकरांची कथा समीक्षेच्या रूढ कल्पनांना धक्का देणारी अभ्यासपूर्ण प्रस्तावना, हे या पुस्तकाचे महत्वाचे वैशिष्ठ्य. वा. ल. कुळकर्णी यांची ही एक लहानशी प्रस्तावना या पुस्तकाला जोडली आहे.

या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या सर्व कथांची, कथासंग्रहाची व कथा छापणाऱ्या नियतकालिकांची सूची या पुस्तकाच्या शेवटी जोडली आहे. ही सूची कोलारकरांच्या सूक्ष्म वाचनाची व व्यासंगाची साक्ष देईल.

* * *

ब्रह्मचारी

(सामाजिक विनोदी नाटक)

लेखक :–आचार्य प्र. के. अत्रे

प्रकाशक :–गं. पां. परचुरे प्रकाशन मंदीर मुंबई ४

मूल्य–चार रुपये

किती वर्षे झाली असतील त्या गोष्टीला जवळ तीस वर्षे ! म्हणजे दोन अडीच पिढ्या लोटल्या. तथापि आचार्य अत्रे व मास्टर विनायक यांनी तयार केलेल्या ब्रह्मचारी चित्रपटाचे विस्मरण लोकांना झालेले नाही. महाराष्ट्रामध्ये लोकप्रियतेचा उच्चांक मोडणारे चित्र म्हणून या चित्रपटाचा उल्लेख करावा लागेल. पराकाष्ठेची सामाजिक नि साहित्यिक मूल्ये ज्यांत काठोकाठ भरलेली आहेत अशी ही कथा नाट्यरूप घेऊन मराठी रंगभूमीवर आलेली आहेत. हा बदल करतांना आचार्यांनी त्यांत अनेक बदल केलेले आहेत. चटकदार संवाद, मार्मिक स्वभावरेखन इ. अत्रे–वैशिष्ट्य चारही नाटकात आहेत. किशोरी-औदुंबरची ही अवखल प्रेमकथा मराठी रंगभूमीवरही नवीन विक्रम करील यात संशय नाही.

अत्रे थिएटर्सनी या नाटकाचा प्रयोग नुकताच रंगभूमीवर सादर केला.

* * *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(मार्च १९६९)

श्री. मा. नो. गलगलीकर
सरचिटणीस

कला केन्द्र

दिनांक २५-१-६९

चित्रकार श्री. ए. सी. नाथ. यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन टिळक सभागृहात भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रा. डॉ. सुनील सुभेदार यांनी केले. अध्यक्षस्थानी श्री. भाऊसाहेब सुर्वे होते.

कै. लोकनायक अणे प्रथम स्मृतिदिन

दिनांक २६-१-६९

सर्वप्रथम श्री. बाबुराव चिमोटे यांनी कै. लोकनायक मा. श्री. उपाख्य बापुजी अणे यांच्या तैलचित्राला पुष्पमाला अर्पण केली. या प्रसंगी श्री. पां. ब. गाडगीळ यांनी कै. अणे यांच्या सुखद आठवणी सांगितल्या. यावेळी वि. सा. संघाचे पदाधिकारी व बरेच कार्यकर्ते उपस्थित होते.

दिनांक २८-१-६९

दक्षिण महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. रा. के. रानडे यांनी वि. सा. संघास भेट दिली. यावेळी संघाध्यक्ष व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

कै. गो रा. दोडके पुण्यतिथी

दिनांक ३१-१-६९

कै. गो. रा. दोडके यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी श्री. वा. के. अत्रे चिटणीस वि. सा. संघ यांनी दोडके यांच्या छायाचित्रास पुष्पमाला अर्पण केली. या प्रसंगी श्री. मा. नी. गलगलीकर सरचिटणीस वि. सा. संघ यांचे प्रमुख भाषण झाले. यावेळी श्री. पां. व. गाडगीळ, सखारामपंत जोशी, प्रा. मुंभ, भाऊसाहेब सप्रे यांनी कै. दोडके यांच्या आठवणी सांगितल्या.

कै. गडकरी स्वागतस्पर्धा

कै. रा. ग. गडकरी यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त संस्येतर्फे रविवार दि. २ फेब्रुवारी ६९ रोजी दुपारी ४ वाजता कै. रा. ग. गडकरी यांच्या नाटकातील स्वगत स्पर्धा धनवटे रंगमंदिरात झाली.
यात महाविद्यालयीन व विद्यालयीन असे दोन गट पाडले होते.

महाविद्यालयीन गटात— श्री. मोहन फाटे, श्री. मुकुंद हंबर्डे, श्री. निरंजन देवरस (विश्वेश्वरैय्या इंजिनिर्रिंग कॉलेज) श्री. अनिल पेंडसे, श्री. विकास भावे, श्री. रवींद्र रानडे (धनवटे नॅशनल कॉलेज), कु. अंजलि शेवडे, श्री. रजन दारव्हेकर (नागपूर महाविद्यालय), श्री. धनंजन आचार्य (जी. जी. टी. डी.), श्री. बी. बी. जानेफळकर (मोहता सायन्स कॉलेज) यांनी भाग घेतला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विद्यालयीन गटात- कुमार हर्षवर्धन निमखेडकर, कु. चंद्रशेखर साल्पेकर, कु. नीलिमा साठे
[हडस हायस्कूल], कुमार सुधीर मंगरूळकर, कुमार दत्तात्रय तुलनकर
[सी. पी. अँड बेरार एज्यु. सोसायटी] कु. संध्या जोग [सोमलवार हायस्कूल],
श्री. मोहन हिंगणीकर [न्यू इंग्लिश हायस्कूल, मुख्य शाखा].

उपरोक्त स्पर्धेचा निकाल त्याच दिवशी जाहीर झाला. महाविद्यालयीन गटात श्री. मोहन फाटे व श्री. विकास भावे यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. तसेच विद्यालयीन गटातून कुमार हर्षवर्धन निमखेडकर आणि कुमार चंद्रशेखर साल्पेकर यांचा अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक आला.

महाविद्यालयीन व विद्यालयीन गटातील प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविणाऱ्या स्पर्धकांना अनुक्रमे रु. २० व १५ ची रोख बक्षिसे दि. ५ फेब्रुवारी ६९ रोजी श्री. बाबुराव चिमोटे यांचे हस्ते देण्यात आली.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. रा. पु. सगदेव, डॉ. डब्ल्यू. दामले व प्रा. डॉ. सुनील सुभेदार यांनी सहकार्य दिले. त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

श्री. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा

स्पर्धांचा निकाल व पारितोषिक-वितरण समारंभ. श्री. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेत या वर्षी–
सीताबाई आर्टस् कॉलेज, अकोला [सुंदर मी होणार].
सुत्रालाल पाटणी कला–वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव [येग येग विठाबाई].
जनता कला–वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर [प्रेमा, तुझा रंग कसा].
धनवटे नॅशनल कॉलेज, [दिल्या घरी तू सुखी रहा].
मेडिकल कॉलेज, [काका किशाचा], हिस्लॉप कॉलेज [काका किशाचा].
विज्ञान महाविद्यालय [तीन चोक तेरा].
गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालय [काका किशाचा].
शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय [काका किशाचा]
या हाविद्यालयमांनी भाग घेतला.
ह्या स्पर्धेत मेडिकल कॉलेजने सादर केलेल्या ‘ काका किशाचा ’ या नाटकाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे या महाविद्यालयाला ‘ श्री खोलकुटे रौप्य ढाल ’ मिळाली.
यावेळी श्री. विकास भावे यांना ‘ दिल्या घरी तू सुखी रहा ’ या नाटकातील ‘ मामा ’च्या पुरुष भूमिकेचे सर्वोत्कृष्ट अभिनयाबद्दल रु. १५-०० चे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. स्त्री भूमिकेचे सर्वोत्कृष्ट अभिनयाचे वैयक्तिक पारितोषिक कु विद्या केळकर यांना ‘ तीन चोक तेरा ’ या नाटकातील ‘ स्वरुपा व श्यामला ’ ची भूमिका केल्याबद्दल रु. १५–०० चे मिळाले.

कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा

यावर्षी कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा ता. १, २, ३, ४ व ५ फेब्रुवारी १९६९ रोजी रात्री ८–३० वाजता धनवटे रंगमंदिरात सादर करण्यात आली. यावेळी एकूण चौदा संस्थांनी भाग घेतला.

ता. १ रोजी प्रबोधिनी शिक्षण संस्था यांनी ‘ भुताटकीच्या घरांत एक रात्र ’ व आनंद कला निकेतन यांनी ‘ भले तरी देऊ ! ’ ही एकांकिका सादर केली.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ता. २ रोजी बँक ऑफ इंडिया यांनी ' सारं कसं शांत शांत ' व उत्कर्ष कला मंदिर यांनी ' बदाम राणी चौकट गुलाम ' व धनवटे नॅशनल कॉलेज यांनी ' प्रयोग ' आणि चित्रकला महाविद्यालय यांनी ' हौशी कलावंत ' ही एकांकिका सादर केली.

ता. ३ रोजी शिवाजी शिक्षण संस्थेचे विज्ञान महाविद्यालय यांनी ' बंडू वशिला लावतो ', चांद्रसेनीय कायस्थ प्रभु सभा यांनी ' कुणी गोविंद घ्या ! ' व रंजन कलामंदिर यांनी ' बिचारे आप्पा बंड करतात ' ही एकांकिका केली.

ता. ४ रोजी सांस्कृतिक सभा, रेशिमबाग यांनी ' दादा ! भाई !! नवरोजी !!! ' व शासकीय आयुर्वेद महाविद्यालय यांनी ' आम्ही रेडिओ घेतो' आणि पोस्टल ऑडिट रिक्रिएशन क्लब यांनी ' खलित्यांची लढाई—दुसरी ' ही एकांकिका सादर केली.

ता. ५ रोजी नागपूर महाविद्यालय यांनी 'चित्रगुप्त ! अहो चित्रगुप्त !' व लेडी अमृताबाई डागा कॉलेज यांनी ' शिवधनुर्भंग ' ही एकांकिका सादर केली.

ही एकांकिका संपल्यानंतर श्री. बाबुराव चिमोटे यांचे हस्ते दोन्ही स्पर्धातील यशस्वी ठरलेल्या चमूला पारितोषिके देण्यात आली.
कै. डावरे एकांकिका स्पर्धेत पोस्टल ऑडिट रिक्रीएशन क्लबने सादर केलेल्या ' खलित्यांची लढाई (दुसरी) ' या एकांकिकेला सर्व प्रथम क्रमांकाचे रु. ५०-०० चे पारितोषिक आणि फिरती रौप्य ढाल मिळाली.
धनवटे नॅशनल कॉलेजने सादर केलेल्या ' प्रयोग ' या एकांकिकेला व रंजन कलामंदिराने सादर केलेल्या ' बिचारे आप्पा बंड करतात ' या एकांकिकेला द्वितीय पारितोषिक रु. ३०-०० चे दोन चमूत विभागून रु. १५-०० प्रमाणे देण्यात आले.
वैयक्तिक अभिनयाचे प्रथम पारितोषिक ' खलित्यांची लढाई (दुसरी) मध्ये गुणाकार घाटपांडेची भूमिका करणाऱ्या श्री. बळवंत वाघमारे यांना रु. १५-०० चे पारितोषिक मिळाले.
द्वितीय क्रमांकाचे रु. १० चे पारितोषिक ' प्रयोग ' मध्ये डॉक्टरची भूमिका करणाऱ्या श्री. अनिल पेंडसे यांना मिळाले.
तृतीय क्रमांकाचे रु. ५ चे पारितोषिक ' बिचारे आप्पा बंड करतात ' या एकांकिकेत ' यमुना ' ची भूमिका करणाऱ्या सौ. शरयू टिपणीस यांना मिळाले.
या दोन्हीही स्पर्धांचे परीक्षक म्हणून श्री. वा. के. अत्रे, श्री. मधुकरराव राजे, श्री. अ. गो. देशपांडे, श्री. आनंद जोग, प्रा. वा. वि. कुळकर्णी, श्री. वा. गो. चोरघडे, व सौ. नलिनी दिवाडकर यांनी सहकार्य दिले.
आम्ही या सर्वांचे अत्यंत आभारी आहोत.

दिनांक १०-२-६९
दैनिक 'सकाळ'चे संपादक डॉ. ना. भी. उपाख्य नानासाहेब परूळेकर यांनी वि. सा. संघास भेट दिली. यावेळी पद्मभूषण पदवी मिळविणारे पहिले मराठी पत्रकार म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी दैनिक महाराष्ट्राचे संपादक श्री. दि. ब. पंडित होते. याप्रसंगी सर्वश्री वसंतराव साठे, प्रा. डॉ. सुनील सुभेदार यांची भाषणे झाली. श्री. आ. रा. देशपांडे यांनी आभारप्रदर्शन केले.

दिनांक १०-२-६९
जळगाव (जामोद) येथे वि. सा. संघाचे संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते वि. सा. संघाची शाखा सुरू करण्यात आली. या प्रसंगी वि. सा. संघाचे चिटणीसद्वय श्री. अ. ल. लिमये आणि वा. के. अत्रे हे उपस्थित होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आजीव सभासद

प्रा. केशव श्रीधर मुनशी, नागपूर हे रु. १०१-०० देऊन संस्थेचे आजीव सभासद झाल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

अभ्यास मंडळ

प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी यांची दिनांक २ आणि ३ फेब्रुवारी ६९ रोजी अनुक्रमे मर्ढेकर–वेदना आणि सौंदर्य व मुक्तिबोध वेदना आणि विजय 'या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्याने' झाली.

* * * * *

दासनवमी निमित्त " दासबोधाची तीन वैशिष्ठ्ये " या विषयावर दिनांक ९–२–६९ रोजी परिसंवाद झाला. परिसंवादात प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे आणि प्रा. भा. श्री. परांजपे यांनी भाग घेतला.
अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे उपाध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख होते. या कार्यक्रमाला समर्थ सेवा मंडळाचे सहकार्य लाभले होते.

* * * * *

श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यास मंडळातर्फे वाङ्मयाचे निरनिराळे प्रकार नवोदित लेखका कडून लिहून घेऊन त्याचे वाचन करण्याची खास योजना आखण्यात आली. या योजनेतील पहिला कार्यक्रम म्हणजे कु. पद्मा नांदे आणि कु. भारती गोखले यांनी १५–२–६९ रोजी वुटी सभागृहात आपल्या कथांचे वाचन केले. यावेळी बरीच मंडळी उपस्थित होती. कथा वाचनाचे वेळी श्री. प्रभाकर पुराणिक श्री. राम कोलारकर व श्री. श्र्यं. खं. गंधे यांनी समीक्षणाचे काम करून सहकार्य दिले. या कार्यक्रमा प्रसंगी विदर्भातील तरुण समीक्षक श्री. राम कोलारकर यांचा सर्वोत्कृष्ट मराठी कथा या त्यांच्या पुस्तकाबद्दल अभ्यास मंडळा तर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

* * * * *

शाखा वृत्त

कारंजा शाखा

दिनांक २४ जानेवारी ६९ रोजी वि. सा. संघाच्या कारंजा शाखेतर्फे कै. राम गणेश गडकरी यांची ५० वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी कुंकुवाई कन्या शाळेत आंतर शालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे अध्यक्षस्थान गुलजी जेठा हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. वामनराव मोकासदार यांनी मंडित केले होते.
दिनांक २५ जानेवारी ६९ रोजी नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेजचे प्राध्यापक म. ना. लोही यांचे " गडकरी व्यक्ति आणि वाङमय " या विषयावर सुश्राव्य भाषण झाले. श्री. लोही यांच्या हस्तेवक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस समारंभ झाला. भाषणाला बरेच साहित्यप्रेमी लोक उपस्थित होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Statement about ownership and other particulars about newspaper Yugwani to be published in the first issue every year after last day of February

Form IV

(See Rule 8)

1. Place of Publication	Vidarbha Sahitya Sangh North Ambazari Road, Nagpur-1.
2. Periodicity of its publication	Monthly.
3. Printer's Name	M. N. Galgalikar.
Nationality—whether citizen of India	INDIAN.
(If foreigner, state the country of origin)	Vidarbha Sahitya Sangh
Address	North Ambazari Road, Nagpur 1.
4. Publisher's Name	
Nationality—whether citizen of India	– do –
(If foreigner, state the country of origin)	
Address	
5. Editor's Name	Prof. P. V. Urdhwareshe
Nationality—whether citizen of India	Indian
(If foreigner, state the country of origin)	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1.
Address	
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital.	Nil

I, M. N. Galgalikar, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd/- M. N. Galgalikar
Signature of Publisher

Date 1-3-1969

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२३ ... १९८०

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर-१
मुद्रणस्थळ : व्हीनस प्रिंटींग हौस, वैद्यवाडी, धंतोली, नागपूर-१

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ